# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १७७ वा ❑ भारतीय सौर दिनांक ०६ भाद्र. शके १९४८, शुक्रवार दि.२८ ऑगस्ट २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### स्नेहबंधाचा नवा ट्रेण्ड: इको-फ्रेंडली आणि सर्वसमावेशक रक्षाबंधन

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

बदलत्या काळानुसार आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे रक्षाबंधन साजरे करण्याच्या पद्धतीत आणि राख्यांच्या डिझाईन्समध्ये अनेक नवीन ट्रेंड्स पाहायला मिळत आहेत.

सध्याच्या काळात रक्षाबंधन सण अधिक अर्थपूर्ण करण्यासाठी इको-फ्रेंडली (पर्यावरणपूरक) आणि सर्वसमावेशक पद्धतींचा नवा ट्रेण्ड वेगाने रुजत आहे.आजकालचा तरुण वर्ग पारंपरिक पद्धतींसोबतच आधुनिकतेला मोठी पसंती देत आहे.मातीत रोखल्यावर रोप उगवतील अशा सीड राखी किंवा कापूस, ताग, व बांबूपासून बनवलेल्या राख्यांना मोठी पसंती मिळत आहे. स्थानिक महिला बचतगट आणि कारागिरांनी बनवलेल्या हस्तनिर्मित राख्यांमुळे पर्यावरण रक्षणासोबतच स्थानिक रोजगाराला मोठा हातभार लागत आहे.हरित भेटवस्तू प्लॅस्टिकऐवजी रोपे, शाश्वत वस्तू किंवा हातातले साहित्य भेट म्हणून दिले जात आहे.

सर्वसमावेशक रक्षाबंधनाचा नवा दृष्टिकोन :सीमा रक्षक जवानांना आदरांजली: देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांसाठी राखी पाठवून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली जात आहे.वृक्षारोपण आणि संवर्धन: एक राखी वृक्षासाठी हा उपक्रम राबवून निसर्गाचे रक्षण करण्याचा संकल्प केला जात आहे.जात-पात, लिंगभेद विसरून नाते: केवळ भाऊ-बहीणच नव्हे, तर कोणत्याही आप्ताशी किंवा समाजघटकांशी स्नेहबंध प्रस्थापित करून हा सण सर्वसमावेशक पद्धतीने साजरा होत आहे.

राख्यांमधील डिजिटल आणि स्मार्ट तंत्रज्ञान: तंत्रज्ञानाची आवड असणाऱ्यांसाठी हा सर्वात मोठा ट्रेंड आहे. या राखीवर मोबाईल टॅप करताच किंवा कोड स्कॅन करताच बहीण-भावाच्या जुन्या आठवणींचे फोटो, व्हिडिओ किंवा ऑडिओ मेसेज स्क्रीनवर उघडतात. परदेशात किंवा दूर राहणाऱ्या भावांसाठी व्हॉट्सअॅप किंवा ईमेलद्वारे अॅनिमेटेड ई-राख्या आणि डिजिटल गिफ्ट कार्ड्स पाठवण्याचे प्रमाण खूप वाढले आहे.

फॅशनेबल आणि वेअरेबल डिझाईन्स:सध्याच्या पिढीमध्ये नकारात्मक ऊर्जेपासून संरक्षण करणारी निळ्या रंगाची इव्हिल आय आणि चार्म राखी प्रचंड लोकप्रिय ठरत आहे. केवळ एका दिवसासाठी राखी न बांधता, ती वर्षभर हातामध्ये फॅशनेबल अॅक्सेसरी म्हणून वापरता यावी, यासाठी चांदीच्या, लेदर बँड आणि नाव कोरलेल्या ब्रेसलेट राख्यांना भाऊ खूप पसंती देत आहेत.

पर्यावरणपूरक राख्या : पर्यावरणाची काळजी घेणारे नागरिक आता ताग, बांबू आणि विविध झाडांच्या बिया वापरून बनवलेल्या राख्या खरेदी करत आहेत. सण संपल्यावर ही राखी कुंडीत लावल्यास त्यातून सुंदर रोपटं तयार होतं. मशीनवर तयार झालेल्या प्लास्टिकच्या राख्यांऐवजी हाताने विणलेल्या सुती, रेशमी आणि लोकरीच्या राख्यांची मागणी वाढली आहे.

लिफाफा किंवा रोख रकमेऐवजी अनुभव भेट: पारंपरिक पद्धतीनुसार पैशांचा लिफाफा देण्याऐवजी आता भाऊ आपल्या बहिणीला थेट डिजिटल गिफ्ट शेअर्स, म्युच्युअल फंड, गॅजेट्स, किंवा स्पा आणि सलोन व्हाऊचर्स सारख्या वस्तू भेट देत आहेत.

बहिणींकडून भावांना गिफ्ट: आता केवळ भाऊच नाही, तर स्वावलंबी झालेल्या बहिणीही आपल्या भावांना त्यांच्या आवडीचे इलेक्ट्रॉनिक गॅजेट्स किंवा कस्टमाइज्ड गिफ्ट्स देऊन सरप्राईज देतात.

नातेसंबंधांची बदलती व्याख्या:भाभी पाळीव प्राण्यांसाठी पाळीव प्राण्यांसाठी राखी: राजस्थानची प्रसिद्ध लुंबा राखी (जी वहिनीला बांधली जाते) आता संपूर्ण भारतात लोकप्रिय झाली आहे. इतकेच नव्हे तर, घरातील पाळीव कुत्रे किंवा मांजरींनाही कुटुंबाचा भाग मानून राखी बांधण्याचा नवा ट्रेंड सुरू झाला आहे.

# मोबाइलयुगात लहानांसाठी संस्कारक्षम लिहिणे आवश्यक-सावित्री जगदाळे

## मसापमध्ये रघुनाथ शिवराम बोरसे विशेष बालवाङ्मय पुरस्काराचे वितरण

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने रघुनाथ शिवराम बोरसे यांच्या नावाने गतवर्षीपासून विशेष बालवाङ्मय पुरस्कार देण्यात येतो. या वर्षीचा बालवाङ्मय पुरस्कार बालसाहित्याच्या क्षेत्रातील लक्षणीय कार्यासाठी सातारा येथील सावित्री जगदाळे यांना बुधवारी, २६ रोजी साहित्य अकादमी बालसाहित्य पुरस्कारप्राप्त लेखक आबा महाजन यांच्या हस्ते समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरूप रुपये अकरा हजार व सन्मानचिन्ह असे आहे.




यावेळी सावित्री जगदाळे म्हणाल्या, शेती-मातीने मला लिहायला शिकवले. अनेक लेखकांनी मला प्रेरणा दिली. कविता, कथा, कादंबरी असा माझा लेखनाचा प्रवास राहिलेला असून, बालसाहित्यात मी विशेष रमते. लहान मुलांसाठी संस्कारक्षम लेखन करणे मला मोबाईलयुगात महत्त्वाचे वाटते. साहित्य परिषदेने माझी दखल घेतली, याचा मला विशेष आनंद आहे.

सावित्री जगदाळे यांच्या लेखनासंबंधी बालसाहित्याचे अभ्यासक विनोद सिनकर यांनी भाष्य केले. यावेळी आबा महाजन यांनी मसापच्या बालसाहित्याला प्रोत्साहन देण्याचे कौतुक केले.

आजच्या काळात विद्यार्थ्यांवर संस्कार करणारे बालवाङ्मय निर्माण होणे अत्यंत गरजेचे असून, सावित्री जगदाळे यांनी मराठी बालवाङ्मयात मोलाची भर घातलेली आहे.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील म्हणाले, ज्या साहित्यावर कोणाचाही प्रभाव नसतो. जे नितळ, निरागस असतं ते साहित्य श्रेष्ठ असतं. आजच्या काळात बालवाङ्मय निर्मिती करणे हे अत्यंत महत्त्वाचे काम आहे. याप्रसंगी प्रा. बाळासाहेब बोरसे, कार्यवाह डॉ. दादा गोरे, सहकार्यवाह डॉ. गणेश मोहिते, बालसाहित्य समितीचे अध्यक्ष डॉ. गणेश घुले व बोरसे परिवार आदी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. हंसराज जाधव यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. विष्णू सुरासे यांनी, तर आभार डॉ. गणेश शिंदे यांनी मानले.

# रक्षाबंधन : एक धागा प्रेमाचा

ज्योतिर्मय साहित्य

रिमझिमणाऱ्या श्रावणधारा,
अंतरी घालती मंजूळ साद,
निसर्गाच्या या हरित रूपात,
घुमतो नात्यांचा संवाद...
रेशमी बंधात विणला जातो,
हा एक धागा प्रेमाचा,
भावा-बहिणीच्या अतूट नात्यात,
सुगंध दरवळे हर्षाचा !

श्रावण मास म्हणजे निसर्गाच्या अलौकिक आनंदाचा, सात्त्विक मांगल्याचा आणि हळव्या चैतन्याचा सोहळा. चहूबाजूला पसरलेली हरितशाल, पर्णसंभारावर डोलणारे नाजूक दवबिंदू आणि मृदगंधाचा सुवास घेऊन येणारा रिमझिम पर्जन्य... अशा या विलोभनीय, संवेदी वातावरणात अवतरतो तो बहिणीच्या अथांग, निखळ मायेचा आणि भावाच्या कर्तव्याचा सण म्हणजेच रक्षाबंधन. निसर्ग जसा वृष्टीच्या रूपाने धरणीला मायेची साद घालतो आणि वसुंधरा जशी हरित शालू नेसून तृप्त होते, अगदी तसेच हे नातेही परस्परांच्या ओलाव्यासारख्या जिव्हाळ्याने प्रफुल्लित होत जाते. मनगटावर बद्ध केला जाणारा हा एक धागा प्रेमाचा केवळ सुताचा तुकडा नाही, तर तो दोन आत्म्यांना जोडणारा, रक्ताच्या पलीकडचा एक अतूट भावनिक सुवर्णसेतू आहे.



बालपणाच्या प्रांगणात एकत्र बागडताना, श्रावणाच्या प्रथम वर्षावात कागदाच्या नौका सोडताना अनुभवलेले ते सुंदर, निष्पाप भावविश्व आजही या सणाच्या निमित्ताने मनात काहूर उठवते. काळाच्या ओघात बहीण सासरी पदार्पण करते, तिची पावले एका नव्या उंबरठ्याकडे वळतात आणि स्वतःचे नवे क्षितिज उभे करताना ती व्यस्त होते. इकडे भाऊही आपल्या कौटुंबिक उत्तरदायित्वाच्या चक्रव्यूहात गुंतून जातो. परंतु, श्रावणाची ही पावन, वेल्हाळ प्रभात जेव्हा उजाडते, तेव्हा अंतराचे सगळे अडसर प्राजक्ताच्या सुगंधी सड्यासारखे विरून जातात. राखीचा हा एक धागा प्रेमाचा भावाला त्याच्या उत्तरदायित्वाचे आणि बहिणीला तिच्या हक्काच्या पाठीराख्याचे स्मरण करून देतो.

दुरावूनही अंतर कधी,
मायेचा बंध सुटत नाही,
सुखाचा हा रेशमी धागा,
काळाच्या ओघात तुटत नाही...
माहेरच्या हक्काची सावली,
भावाच्या रूपात उभी असते,
म्हणूनच प्रत्येक बहीण ही,
भावाच्या काळजाचा तुकडा असते
!

या नात्यातील सर्वात हळवा आणि काळजाला भिडणारा पैलू म्हणजे, बहीण सासरी गेल्यानंतरही तिचे लाडके माहेरपण भावाच्या अस्तित्वात जिवंत राहते. आई-वडिलांनंतर माहेराची हक्काची जागा म्हणजे भाऊ असतो. भाऊ केवळ पाठीराखा नसतो, तर तो बहिणीच्या सुखात हसणारा आणि तिच्या डोळ्यांतील कोरडेपणही वाचू शकणारा एक मूक, संवेदी कप्पा असतो. तिच्या सुखात मनापासून हसणारा आणि तिच्या डोळ्यांत अश्रू ओघळण्यापूर्वीच आपल्या मायेने ते टिपणारा तो एक आधार असतो. बहीण कितीही लांब असली, तरी भावाच्या काळजाचा एक हळवा तुकडा तिच्या सुखासाठी देवापाशी अखंड प्रार्थना करत असतो. तू काळजी करू नकोस, तुझा हा भाऊ सदैव तुझ्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, हा एका अक्षराचाही उच्चार न करता दिलेला शब्दातीत, निखळ विश्वास या सृष्टीतील सर्वात मोठे अभेद्य कवच ठरतो.

या सणाची भव्यता आणि संवेदनशीलता तेव्हा आणखी वाढते, जेव्हा सीमांवर देशाच्या संरक्षणासाठी अहोरात्र लढणाऱ्या आपल्या वीर जवानांची आठवण येते. स्वतःच्या घरादाराचा आणि सख्ख्या बहिणीचा त्याग करून, जे लाखो भारतवासीयांच्या रक्षणासाठी छातीचा कोट करून उभे आहेत, ते देशाचे सुपुत्र खऱ्या अर्थाने या सणाचे मानकरी आहेत. रक्षाबंधनाच्या या पावन दिनी, देशातील प्रत्येक बहीण प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे आपल्या सीमेवरील भावाच्या दीर्घायुष्यासाठी देवाकडे प्रार्थना करत असते. कर्तव्याच्या वेदीवर हसतमुख राहणाऱ्या या जवानांच्या मनगटावर बांधलेली देशाच्या लेकींची राखी, त्यांना अधिक बळ देते. एका बाजूला कौटुंबिक प्रेमाचा ओलावा आणि दुसऱ्या बाजूला राष्ट्ररक्षणाचे महान कर्तव्य, या दोन्ही प्रवाहांचा संगम या सणाच्या निमित्ताने घडून येतो.




राष्ट्ररक्षणाची हीच जाज्वल्य भावना जेव्हा आपण कौटुंबिक आणि सामाजिक पातळीवर पाहतो, तेव्हा भावा-बहिणीचे हे नाते साहित्याच्या परिभाषेत निसर्गाने मायेच्या शाईने लिहिलेले सर्वात सुंदर आणि अभिजात महाकाव्य म्हणून समोर येते. यात जशी सीमेवरील भावाची शौर्यगाथा आहे, तशीच संसारात पाठीशी उभे राहणाऱ्या भावाच्या गाभाऱ्यात मातृत्वाची वात्सल्यमयी पाखर आहे, पितृत्वाचे खंबीर छत्र आहे आणि एका जीवाभावाच्या मित्राची निस्सीम साथ आहे. म्हणूनच, भौगोलिक दृष्ट्या अंतर कितीही अंतराचे किंवा सीमांचे असले, तरी या स्नेहबंधाची आर्त ओढ दोन्ही बाजूंच्या हृदयात तेवढीच उत्कट आणि ताजी होत जाते. हा सण आपल्याला संदेश देतो की, नाती केवळ रक्ताच्या वारशाने नाही, तर श्रावणाच्या ओलाव्यासारख्या हळव्या भावबंधांनी आणि परस्परांवरील अढळ निष्ठेने चिरंतन टिकून राहतात. म्हणूनच, हा एक धागा प्रेमाचा केवळ मनगटावर परिधान करायचा नसून, तो परस्परांच्या हृदयात निसर्गाच्या चैतन्यासारखा जन्मोजन्मी जपायचा असतो.

श्रावणसरींच्या मधुर तालावर,
नात्यांचे हे गीत घुमावे,
सीमेवरील त्या वीर जवानांचे,
शौर्य मनी आठवावे...
हा एक धागा प्रेमाचा,
देशाच्या रक्षकांना बळ देवो,
राष्ट्रप्रेमाचा आणि मायेचा,
हा जिव्हाळा अखंड राहो !

# ।। संस्कृतनिष्ठ जीवनाची प्रेरणादायी वाटचाल ।।

ज्योतिर्मय साहित्य

संस्कृत ही केवळ प्राचीन भाषा नसून भारतीय ज्ञानपरंपरा, संस्कृती आणि जीवनदृष्टीची समृद्ध वाहक आहे. या जाणिवेतून सौ. मानसी शास्त्री आणि डॉ. चन्द्रहास शास्त्री यांनी संस्कृतच्या प्रचार-प्रसारासाठी आणि संस्कृतनिष्ठ जीवनमूल्यांच्या संवर्धनासाठी सातत्याने कार्य केले आहे. त्यांच्या या कार्याचे संस्थात्मक रूप म्हणजे 'अभिज्ञान, पुणे'.

संस्कृत ही केवळ अभ्यासक्रमापुरती मर्यादित न राहता ती समाजजीवनाचा भाग व्हावी, संस्कृतविषयी प्रेम आणि आत्मीयता निर्माण व्हावी आणि भारतीय ज्ञानपरंपरेचा परिचय नव्या पिढीला व्हावा, या उद्देशाने 'अभिज्ञान'च्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जातात. संस्कृत अध्यापन, व्याख्याने, साहित्यिक उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, संस्कृतप्रेमींचा गौरव आणि ज्ञानपरंपरेशी संबंधित विविध उपक्रम






यांमधून त्यांचे कार्य सातत्याने पुढे जात आहे.

सौ. मानसी शास्त्री यांचा संस्कृत अध्यापनातील सहभाग, संस्कृतविषयक उपक्रमांतील सक्रियता आणि संस्कृतप्रती असलेली आत्मीयता या कार्याला संवेदनशील आणि सृजनशील रूप देते. डॉ. चन्द्रहास शास्त्री यांच्या अध्यापन, लेखन, व्याख्यान आणि संस्कृतप्रचाराच्या कार्याला त्यांच्या वैचारिक दृष्टिकोनाची जोड लाभते.

त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे संस्कृतचा केवळ प्रचार न करता संस्कृत जगण्याचा प्रयत्न. म्हणूनच त्यांच्या संपूर्ण संस्कृतनिष्ठ वाटचालीचे सार एका वाक्यात व्यक्त करता येईल –

''संस्कृतस्य जीवनं संस्कृताय जीवनम् ।''





## जात्यावरच्या ओव्या......

आज दमले दमले
द्या ना पेलाभर पाणी
चार लेकराची माय
एका राजाची राणी ||८१६||

आज दमले दमले
बसते गार हवेला
हाती कपभर चहा
काय पाहिजे जीवाला ||८१७||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ६७

ज्योतिर्मय साहित्य

**घनःश्याम हा राम लावण्यरूपी ।**
**महा धीर गंभीर पूर्णप्रतापी ।**
**करी संकटी सेवकाचा कुडावा ।**
**प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।।६७।।**


अर्थ : पावसाळी मेघाप्रमाणे श्यामल वर्ण असलेला हा राम अत्यंत सुंदर आहे. तो महा धैर्यवान आणि गंभीर असा असून अत्यंत पराक्रमी आहे. संकटात आपल्या भक्ताचे तो रक्षण करतो. अशा या श्रीरामाचे पहाटे चिंतन करावे.

( कुडावा - रक्षण )

विवेचन : मनाच्या श्लोकांमधील श्लोक ६६ ते ७६ हा दहा श्लोकांचा एक वेगळा गट आहे. याचे वैशिष्ट्य असे की या श्लोकांमध्ये समर्थ रामाच्या सगुण रूपाचे वर्णन करतात. आपल्याला त्याचे ध्यान करायला सांगतात. परमेश्वराची निर्गुण भक्ती ही श्रेष्ठ आणि सूक्ष्म मानली जाते. परंतु सगुण भक्ती आपल्यासारख्या सामान्य साधकांसाठी सुलभ आहे. म्हणून सुरुवात करायची झाली तर ती सगुण भक्तीपासून करावी. या पृथ्वीवर आपण देह धारण करून आलो आहोत. परमेश्वर देखील जेव्हा जेव्हा या धरतीवर अवतीर्ण झाला तेव्हा तेव्हा त्याने देह धारण करूनच आपले कार्य केले. त्यामुळे परमेश्वराच्या सगुण रूपाची कल्पना करणे आपल्याला सोपे जाते. म्हणूनच समर्थ या दहा श्लोकांच्या माध्यमातून श्रीरामाचे ( परमेश्वराचे ) सगुण रूप आपल्यासमोर ठेवताहेत.




श्रीरामाचे रूप कसे आहे ? तर पावसाळी मेघाप्रमाणे सावळा. सावळाच रंग तुझा पावसाळी नभापरी... त्या सावळ्या रंगात विलक्षण सौंदर्य आहे. वेद आणि पुराणात वर्णिल्याप्रमाणे आपले बहुतेक देव सावळेच आहेत. विष्णू, विठ्ठल, श्रीराम हे सावळेच




आहेत. सावळे सुंदर, रूप मनोहर. राहो निरंतर ह्रदयी माझ्या... असे संत तुकाराम म्हणतात. तेच समर्थ आपल्याला सांगत आहेत. श्रीरामाचे रूप वर्णन करताना समर्थांनी राम सुंदर आहे असे न म्हणता लावण्यरूपी असे म्हटले आहे. लावण्य या शब्दात आणखी खोल, गहन असा अर्थ आहे. त्यात माधुर्य आहे. म्हणून संतांनी देखील विठ्ठलाला लावण्याचा गाभा असे म्हटले आहे.

या श्लोकाच्या दुसऱ्या ओळीत समर्थ श्रीरामाचे गुण वर्णन करताना म्हणतात, महा धीर गंभीर पूर्णप्रतापी. महा हे विशेषण धीर आणि गंभीर या दोन्ही शब्दांसाठी लागू होते. तो अत्यंत धैर्यशाली आहे. तसेच तो अत्यंत गंभीर देखील आहे. इथे गंभीर या शब्दाचा अर्थ शब्दशः घ्यायचा नाही. तर जीवनातील सर्व संकटांचा सामना करताना जे धैर्य आणि गांभीर्य लागते, त्या अर्थाने हा शब्द इथे आला आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर श्रीरामांचे धैर्य आणि शौर्य सागराप्रमाणे अपार आहे. सागराजवळ अमर्याद जलसाठा आहे. पण तरीही तो आपले गांभीर्य म्हणजेच आपली मर्यादा सोडत नाही. तसेच सर्वगुणसंपन्न श्रीराम आहेत. ते पूर्णप्रतापी आहेत म्हणजे अत्यंत पराक्रमी आहेत. श्रीराम म्हणजे मूर्तिमंत सौंदर्य, धैर्य आणि गांभीर्य, पराक्रम ! असे अनेकविध गुण त्याच्या ठिकाणी वसतात. **(क्रमशः)**



ॐ नमो भद्र हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्र हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्र हनुमते नमः🙏🙏

## ॥ संजय उवाच... ॥




@संजय काव्या पुणे 7743918559

**चांगलं काम सुरु करण्यासाठी मुहूर्त शोधत बसायची गरज नसते, ज्याक्षणी तुम्ही काम सुरु करणार तोच चांगला मुहूर्त समजा. यश अपयश आपल्या कर्तबगारीवर अवलंबून असते. वेळ कोणतीच वाईट नसते, ग्रह बदलण्याची ताकद आपल्याच हातात असते.**

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

## अखंड समाधानाचा मार्ग : नामस्मरणः वृद्धांना उपदेश



**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

ज्योतिर्मय साहित्य

अखंड रामसेवा ज्याला लाभली । धन्य धन्य त्याची माउली ।। स्वार्थरहित रामसेवा । याहून दुजा लाभ न जीवा ।। वाचेने भगवंताचे नाव । कायेने भगवंतसेवा । चित्ती भगवंताचे ध्यान । आपण रहावे रामार्पण । याहून अन्य सेवा । कोणतीही नाही जाण ।। जे जे दिसते ते ते नासते । हा बोध घेऊनि चित्ती । सज्जन लोक जगी वर्तती । तैसे तुम्ही आता वागा जगात ।। मुलां-बाळांस सांभाळून राहावे । प्रपंचात उदास न व्हावे ।। प्रपंचाची उपाधि । आता मनात न आणावी ।। उपाधिवेगळे झाला । ऐसे ऐकू द्यावे मला ।। उपाधीत राहिला । परि चित्ताला न वास दिला । ऐसे ठेवा मनी । राम आणावा ध्यानीं । आता यापरतें हित । नाहीं दुसरे जगांत । हा माझा बोल । न मानावा फोल ।। आता रामा तुझा झालो । कर्तेपणातून मुक्त झालों । ऐसें आणावे मनांत । शक्य तितके राहावे नामात । याहून दुसरें न आणावे मनांत ।। लौकिकांतील मानापमान । यांचे सोडावें उदक । ध्यानीं आणावा रघुनंदन एक ।। बायको-मुलांबाळांत राहावे । चित्त रामाकडे ठेवावें । होईल तेवढे नाम घ्यावें ।। अंतरी परमात्मा त्यास । ठेवून साक्ष भावे भजावे रघुनाथास । न सोडावा मनाचा धीर । मागे आहे रघुवीर ।।

वृद्धपण आलें । शरीर क्षीण झालें । तरी आपण अभिमान घेऊनच राहिले । त्यास सोडावें दूर । प्रपंचांत वृद्धपणीं न पाहावें । मुलांस मार्ग दाखवून सुखी राहावें । औषध पथ्यपाणी सांभाळावें । पण दु:खी कष्टी कधीं न व्हावें ।। शरीरसंपत्ति क्षीण झाली । तरी वृत्ति क्षीण नाही बनली ।। जोवर देहाची संगति । तोवर 'मी-माझें' ही वृत्ति ।। आता वृत्ति राखावी रामापाशी । दुजी उठू न द्यावी त्यापरती ।। आजवर जें घडलें । ते प्रापंचिक, पारमार्थिक असो भले । तें रामकृपेने झाले । हे ठेवावे चित्तीं । आता न सोडावा रघुपति ।। वयोमानानें शरीर होतें क्षीण । वागणें आहे फार जपून ।। देह आळशी न ठेवावा हे जरी खरें । तरी त्याची परिस्थिति ओळखून राहणे हे बरे ।। आता आपण झालो शरीराचे अधीन । हे वयोमानानें दृश्य भासत । तरी भाव ठेवा रामापायीं । ज्याला क्षीणता कधीं आली नाहीं ।। चित्तीं राखावें समाधान । आनंदानें संसार करावा जाण ।। समाधानाचें करावे जतन । ते नसावें कशावर अवलंबून ।। लाभहानींत न गुंतवता मन । राखता येईल समाधान ।। समाधानाला अडवणूक जाण । माझा मीच आपण ।। देहाचे भोग ठेवावे देहाचे माथीं । समाधानांत राखावी वृत्ति ।। सर्व कर्ता राम हा भरवसा ठेवावा ठाम । मग काळजींचे उरलें नाहीं काम । हे सर्व जुळतें म्हणतां राम राम ।। तरी सर्वांनीं घ्यावे रामनाम । व्हावें परमात्म्याचे आपण । कृपा करील रघुवीर ।।

मागणे तुम्हा एकच पाही । नामावाचून दूर कधीं न राही ।।

## ॥ अध्यात्म ॥

मधुकर बोरीकर, पुणे

### श्री लक्ष्मी व नरसिंह मंदिर निरा नरसिंगपूर



पुढे......

आख्यायिका

आपला भाऊ हिराण्याक्ष याचा वध भगवान श्री विष्णुनी केला म्हणून, हिरण्यकशपूला श्री विष्णूचा खूप राग आला. याचा बदला घ्यावा म्हणून, हिरण्यकशिपू नावाच्या दैत्याने घोर तपश्चर्या करायला सुरुवात केली. तो तपश्चर्येला जाताना त्याची पत्नी कयाधू ही गर्भवती होती.

हिराण्याक्ष व हिरण्यकशीपु यांच्या जाचा मुळे अवघे त्रैलोक्य त्राही माम झाले होते. इंद्र देवाला असे वाटले की, हिरण्यकशिपू तपा नंतर अधिक शक्तिशाली होईल, व तो सर्वांना पीडा देईल. तो घरी हजर नसताना, इंद्राने त्याच्या पत्नीचे अपहरण केले. त्याचा विचार असा होता की, कयाधू व तिच्या पोटातील गर्भ हा नष्ट करावा, म्हणजे निदान पुढे जन्मणारा दैत्याचा मुलगा वाईट कृत्य करणार नाही. तो आकाश मार्गाने जात असताना, महर्षी नारद मुनींनी त्याचा रस्ता अडविला. (क्रमश:)




### कोणीही कोणाशिवाय थांबत नाही!

मित्रांनो, मानवी जीवन हे अथांग,विशाल आहे. जीवन कसे जगावे, रहावे, आचरण कसे करावे किंवा काय करू नये हे ज्याचे त्याने ठरवावे! निसर्ग जसा आपल्या नियमानुसार व वेळेनुसार आपले दृष्य अदृष्य रूप दाखवितो. जसे रोज सूर्य चंद्र गगनात दिसने, पृथ्वीवर ऋतूचे येणे ऊन्हाला पावसाळा हिवाळा येणे. तसेच पशूपक्षाचे प्राण्याचे जीवन ही चालते. तेथेही कोणी कोणासाठी थांबून रहात नाही! झाडे वाढतात, फुलत असतात, फुलेफले देतात. अगदी तसेच आपले जीवन आहे. येथेही त्या सृष्टीकर्याने काही नियमाने सूत्रांनी व विशीष्ठ क्रमाने जसे बालपण, तारूण्य ते प्रौढावस्थ.. पण म्हणून "कोणी कोणासाठी थांबत नाही" तुम्हाला काय वाटते? अजून सोपे सांगतो, ज्याचा त्याचा कार्यकारण संबंध तेवढ्याच असतो!पण आपण त्याला कुटुंब नाते गाव घरदार समाज राष्ट्र हे नावे देऊन सोय पाहतो! हे आपापल्या सोयीनुसार थांबे किंवा पायर्या आहेत.या थोडी विश्रांती घ्या,थांबा ,कार्य करा पण थांबू नका !असे आपले संत, अद्यात्म आणि भक्ती पुराणग्रंथ हेच सांगतात. पृथ्वीवर कोणी अमर नाही. म्हणून कोणी कोणासाठी, कोणाशिवाय थांबत नाही! आज एवढे पुरे.थांबतो. आपण वाचत राहा सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे. स्वस्थ रहा मस्त राहा. सुप्रभात.



# केस गळती थांबवा

ज्योतिर्मय साहित्य

आवळ्याचे चुर्ण तयार करुन हे चुर्ण दह्यात मिसळून घ्यावे. यानंतर आवळा आणि दह्याची पेस्ट तयार करून केसाच्या मुळाला लावावी. एका तासानंतर केस स्वच्छ धुवावेत. आठवड्यातून दोन वेळा हा प्रयोग केल्यानंतर डोक्यावर केस यायला लागतील.

शिकाकाईच्या बीयामध्ये थोडे पाणी टाकून बारिक करून घ्यावे. रात्रभर पेस्ट थंड असेलल्या ठिकाणी ठेवावी. सकाळी हे पेस्ट केसाला लावून अर्ध्या तासानंतर केस स्वच्छ करावे. हे पेस्ट केसासाठी नॅचरल शॅम्पूचे काम करते. याचा वापर वारंवार केल्यानंतर केस गळतीची समस्या दूर होते.

जास्वदांच्या फुलाचा रस काढून घ्या. या रसाने केसाची मसाज करा. एका तासानंतर केस स्वच्छ करावेत. केस दाट होण्याबरोबरच काळे होतात.

जटामांसी या वनस्पतीला नारळाच्या तेलामध्ये उकळून हे तेल थंड झाल्यानंतर बॉटलमध्ये भरावे. रोज रात्री हे तेल डोक्याला लावल्यानंतर केस गळणार नाहीत.

झेंडूचे फुल बारीक करून त्याचा रस काढा. हा रस नारळाच्या तेलात टाकून उकळून घ्या. हे तेल थंड झाल्यानंतर बाटलीत भरून ठेवा. हे तेल रोज केसाला लावल्यानंतर केस गळणार नाहीत.



संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

ऑलिव्ह ऑइल मध्ये एक चमचा मध आणि एक चमचा दालचीनी व एक चमचा जेष्ठमध पावडर टाकून पेस्ट तयार करावी. स्नान करण्याआगोदर ही पेस्ट डोक्याला लावावी. पंधरा मिनिटा नंतर केस कोमट पाण्याने स्वच्छ करावेत. काही दिवसात केस गळती बंद होईल.

दोन लीटर पाण्यामध्ये आवळ्याचे चुर्ण, लिंबाची पाने टाका. दोन लीटर पाणी आर्धे होईपर्यंत उकळत ठेवा. या पाण्याने आढवड्यातून दोन वेळा केस स्वच्छ करा. यामुळे केस गळती थांबते.

***

## प्रभातपुष्प

**षटकोळी माझी**

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

**श्री स्वामी समर्थ**

गोड तुझे नाम
श्री स्वामी समर्थ
मुखी सदा जप
श्री सारामृत वाचता
दूर दुःख करू
योग,याग,तप

श्रीदत्त गुरु माझे
अवतार घेतले त्यांनी
श्रीस्वामी समर्थ रुपाने
निराकार रुप सगुण
पुण्य लाभेल खरे
सेवा करावी मनोभावाने

# एकटेपणात मुकेश यांचा दर्दभरी सूर सुखद - श्रीकांत कात्रे

## दीपलक्ष्मी हॉलमध्ये रंगली मुकेशच्या गाण्यांची मैफिल



**ज्योतिर्मय साहित्य**

सातारा - समूहात जगतानाही माणूस एकटाच जगत असतो, मरत असतो. ज्यावेळी त्याच्यासोबत मुकेशच्या आवाज आणि दर्दभरी सूर असतो त्यावेळी त्याचा एकटेपणाही सुखद ठरतो, असे मत ज्येष्ठ पत्रकार व दै. प्रभातचे निवासी संपादक श्रीकांत कात्रे यांनी व्यक्त केले.

यावेळी व्यासपीठावर प्रकाश गवळी,मुकुंद फडके,राजेंद्र सुरवसे, सुहास पोळ,बशीर बागवान,शिरीष चिटणीस उपस्थित होते.

येथील दीपलक्ष्मी सहकारी पतसंस्था व विजय साबळे यांच्या संयुक्त विद्यमाने दीपलक्ष्मी सभागृहात गायक मुकेश यांच्या पुण्यतिथीनिमित्त आवाज एक फनकार अनेक या कार्यक्रमात मुकेश यांच्या गाण्यांनी मुकेश यांना मानवंदना देण्यात आली. त्यावेळी श्री. कात्रे बोलत होते. या कार्यक्रमात विजय साबळे यांनी एकट्यानेच मुकेश यांची गाणी गाऊन सभागृह मंत्रमुग्ध करुन टाकले.

श्रीकांत कात्रे म्हणाले, ''मुकेश यांच्या गाण्यांनी भारतीयांचे जगणं समृद्ध झाले आहे. त्यांच्या भावस्पर्शी, हृदयस्पर्शी आवाजाने मन गाण्यात गुंतून जाते. मुकेशच्या आवाज आपल्या काळजाला भेदून जातो. त्याच्या आवाजातील गाणं, गाण्याचे शब्द, शब्दांचे अर्थ मनाचा गाभारा सुखावून जातात. हृदयाच्या कप्प्यात घर करुन राहते ती एक वेदना. काही वेदना आनंददायी अनुभव देणाऱ्या असतात. आतल्या आवाजाला साद घालणाऱ्या असतात. ''

भान हरपून टाकणारा हा काळजाला थिरकवणाऱ्या आवाजाचा मालक आपल्यातून खूप लवकर गेला. आजच्या अस्वस्थ वातावरणात या गायकाने आपल्याला पुढे जाण्यासाठी वाट दाखवली असती. गाण्यातून जगण्या मरण्याची, सुखदुःखाची आस मनाला ताजेतवाने करणारा आवाज आजही आपल्यासोबत आहे हेही थोडे नाही. या आवाजाबरोबरच आपण सर्वजण चालत आहोत. चालणार आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले.

मुकुंद फडके यांनी आपल्या मनोगतात मुकेश यांनी 'सप्तपदी' या मराठी चित्रपटातील 'एकदा येऊन जा' हे एव्हडे एकच गाणे म्हंटल्याची माहिती दिली.

शिरीष चिटणीस यांनी आपल्या मनोगतात म्हणाले,आज आपण महान पार्श्वगायक, स्वरसम्राट आणि रसिकांच्या हृदयावर अधिराज्य गाजवणारे मुकेशचंद्र माथूर, अर्थातच आपले लाडके गायक मुकेशजी यांच्या २७ ऑगस्ट रोजी होणाऱ्या ५०व्या पुण्यतिथीनिमित्त आज आपण एकत्र आलो आहोत. त्या निमित्ताने गायक विजय साबळे मुकेशजी यांची २५ गाणी एकटे सादर करणार आहेत ही सातारकरांसाठी अभिमानास्पद घटना आहे हे स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले, २७ ऑगस्ट १९७६ रोजी अमेरिकेतील डेट्रॉईट येथे मुकेशजींचे अकस्मात निधन झाले; परंतु त्यांचा स्वर, त्यांची भावपूर्ण गायकी आणि त्यांच्या गीतांमधून व्यक्त होणाऱ्या भावना आजही आपल्या मनात जिवंत आहेत.

लौटके आ गाण्याने सुरुवात करुन एका दर्दभऱ्या सुखद वातावरणात घेऊन जात विजय साबळे यांनी आज सर्वांचाच मूड श्रीमंतावस्थेत नेला. या कार्यक्रमासाठी साबळे यांनी निवडक २४ गाण्यांची निवड केली होती.साबळे यांनी आपल्या सादरीकरणाने उपस्थित रसिकांची संध्याकाळ अविस्मरणीय केली. ओ जानेवाले हो सकते तो लौट के आजा..., या गाण्याने त्यांनी या मैफिलीची सांगता केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्मिता शेरकर यांनी केले सचिन शेवडे यांनि ध्वनी व्यवस्था सांभाळली.



# महाराष्ट्र बँकेतील ८० कर्मचाऱ्यांचा अमृत महोत्सवी सत्कार

## निवृत्त कर्मचाऱ्यांचे प्रश्न जास्त दिवस प्रलंबित ठेवू नये-महाराष्ट्र बँकेचे माजी कर्मचारी व माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांचे बँक व्यवस्थापनास आवाहन

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - भारतीय मजदूर संघाशी संलग्न असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र रिटायर्ड एम्प्लॉइज ऑर्गनायझेशन ह्या निवृत्त बँक कर्मचारी संघाच्या वतीने पंचाहत्तर वर्षे पूर्ण झालेल्या ऐंशी कर्मचारी,अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.''निवारा'' मध्ये संपन्न झालेल्या कार्यक्रमात माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर जे बँक ऑफ महाराष्ट्र चे माजी बँक कर्मचारी आहेत त्यांची ह्या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती.त्यांचाही पंचाहत्तर वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सत्कार ह्यावेळी करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरवातीस संघटनेचे कार्याध्यक्ष भास्कर माणकेश्वर यांनी पाहुण्याचे स्वागत केले व संघटनेच्या विविध सामाजिक प्रकल्पांची माहिती दिली.राजगड तालुक्यातील दुर्गम गुहिनी गाव दत्तक घेतल्याची माहिती तसेच ''सामाजिक कृतज्ञता निधी'' चे समर्पण आत्तापर्यंत तीन कोटी रुपयांचे झाले असल्याची माहिती दिली.

अध्यक्षस्थानावरून बोलतांना कार्यकारी संचालक सुशांत कुमार मोहंती म्हणाले,''महाराष्ट्र बँकेतील कुटुंब निवृत्ती धारकांची संख्या तीन हजार आठशे इतकी असून निवृत्तधारक बारा हजारच्या वर आहे. बँकेच्या प्रगतीमध्ये त्यांचा मोठा वाटा असल्याचे ह्यावेळी नमूद केले.बँकेचा व्यवसाय एकोणीस टक्क्यांनी वाढला असून सात हजार कोटींचा नफा झाला आहे''

महाराष्ट्र बँकेचे माजी कर्मचारी व माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर सत्काराला उत्तर देतांना म्हणाले, महाराष्ट्र बँकेच्या व्यवस्थापनाने बँक निवृत्तधारकांचे प्रश्न जास्त काळ प्रलंबित ठेवू नये अशी अपेक्षा यावेळी व्यक्त केली.निवृत्ती धारकांनी आपले जीवन आनंदी वातावरणामध्ये जगावे म्हणजे मन:शांती मिळेल.तरुणांशी संवाद साधत जावा म्हणजे नैराश्याची भावना दूर होईल.'' व्यासपीठावर मोहन घोळवे,प्रकाश जावडेकर,बाळासाहेब फडणवीस,भास्कर माणकेश्वर यांची मुख्य उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरवातीस चंद्रशेखर बोरोळे यांनी श्रमिक गीत गायले.मधुकर शिधये यांनी शंख वादन केले.सूत्र संचलन वीणा इतराज व शुभांगी कुलकर्णी ह्यांनी केले.सुमेधा दफ्तरदार यांनी पसायदान गायले.संघटनेचे अध्यक्ष मोहन घोळवे यांनी आभार मानले.

# धोंडीरामसिंह राजपूत लिखित कविता संग्रह ''चिंतातुर शेतकरी'' आणि ''लढा'' काका कोयटे यांना प्रदान

**ज्योतिर्मय साहित्य**

वैजापूर : महाराष्ट्र राज्य पतसंस्थाचे अध्यक्ष व कोपरगाव येथील समता पतसंस्थेचे चेअरमन ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांना मराठवाडा विभागाचे जेष्ठ साहित्यक तथा जेष्ठ नागरिक धोंडीरामसिंह ध राजपूत यांनी आपले दोन कविता संग्रह जे नुकतेच प्रकाशित झालेले आहेत ''चिंतातुर शेतकरी'' व ''लढा'' कोयटे

यांना सोमवार (ता,२४)रोजी जेष्ठ नागरिक मेळाव्यात प्रदान करून विनंती केली की, देशाचा शेतकरी अत्यंत चिंताग्रस्त आहे, निसर्ग व शासन त्यांच्याकडे दुर्लक्ष करते, तसेच महिला हा समाजातील घटक अत्यंत दुर्लक्षित आहे, अलीकडे महिला व मुलींवर सामाजिक, कौटुंबिक अन्याय व अत्याचार वाढले, यांना वाचा फुटावी हे अन्याय, अत्याचार थांबावे यासाठी सर्व थरावर सर्वंकष प्रयत्न व्हावे यासाठी महिला व मुली याचा लढा अशा विविध घटकावरील लढे ''लढा'' या काव्य संग्रहात आहेत त्यांना ही वाचा फुटावी म्हणून लिहिलेले हे दोन्ही काव्य संग्रह स्वीकारून आपण ही प्रयत्नशील असावे अशी विनंती कवी धोंडीरामसिंह राजपूत यांनी काका कोयटे यांना करून कविता संग्रह त्यांना सुपूर्द केले. या प्रसंगी वैजीनाथ जेष्ठ नागरिक सेवा संघ अध्यक्ष प्रकाशशेठ



बोथरा, आधार जेष्ठ नागरिक संघ अध्यक्ष उत्तमराव साळुंके,चैतन्य जेष्ठ नागरिक सेवा संघ अध्यक्ष साहेबराव साळुंके, व उत्कर्ष जेष्ठ महिला नागरिक सेवा संघ अध्यक्षा सौ. अंजलीताई सुरेश जोशी व शहरातिल जेष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....**



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

**Dr Shaikh A H - 98606 99906**



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### काका (कुटुंबाचा भक्कम आधारस्तंभ)

पुढे....

आमची गावाकडे थोडीशी शेती होती. माझे वडील त्यांची शहरातील नोकरी सोडून शेती करण्यासाठी गावाकडे आले आणि तेथेच स्थायिक झाले. माझे दोन्ही काका नोकरीनिमित्त शहरात होते. एक काका मोठे आणि दुसरे लहान; माझे वडील मधले. काका कधी कधी सुट्टी मिळाली की गावी येत असत. काका आले की आम्हाला कोण आनंद व्हायचा! मग काकांबरोबर दोन-चार दिवस मजा असायची. कधी सुट्टीत काकांकडे राहायलाही जायचो. काकांच्या प्रेमाचे अनेक प्रसंग आजही आठवतात. त्यांनी शहरात राहूनही खेड्यात राहणाऱ्या आणि शेतीत राबणाऱ्या माझ्या वडिलांना वेळोवेळी मदत केली. कारण शेती थोडी असल्याने फार पैसा पदरात पडत नव्हता. कधी ओला दुष्काळ, तर कधी कोरडा दुष्काळ! पीक चांगले आले तर बाजारात भाव पडलेले असायचे. अशा वेळी काका पैसे पाठवून मदतीचा हात देत. एकदा तर माझे वडील खूप आजारी झाले होते. आमचं गाव म्हणजे एक छोटं खेडं असल्याने वैद्यकीय उपचारांची सोय नव्हती. तेव्हा काका गावी येऊन वडिलांना आपल्या सोबत घेऊन गेले. त्यांना चांगल्या दवाखान्यात दाखल केले, त्यांची शुश्रूषा केली. असे अनेक प्रसंग आहेत. त्यामुळे काका म्हणजे मदतीचा हात, काका म्हणजे प्रेम या गोष्टी मनात पक्क्या झाल्या. पण काकांनी प्रेम लावले तसेच संस्कारही केले, शिस्तही लावली. (क्रमश:)

## कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे

© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495



### प्रेमातून धर्माकडे-श्रीकृष्णावताराचे रहस्य

भगवंताचा अवतार केवळ लीला करण्यासाठी नसतो; तो धर्मसंस्थापनेसाठी असतो.

भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्ण स्वतः घोषित करतात

"यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्॥"
(गीता ४.७)

"परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे॥"
(गीता ४.८)

द्वापरयुगातही अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. कंस, जरासंध, शिशुपाल, नरकासुर यांसारख्या अत्याचारी राजांनी पृथ्वीला भयभीत केले होते. ऋषिमुनींचे यज्ञ विघ्नित होत होते, धर्माचा ऱ्हास होत होता आणि सत्याचा अवमान होत होता.

या काळात श्रीकृष्णांनी प्रथम प्रेम, वात्सल्य आणि भक्तीची गंगा वाहिली. वृंदावनातील बाललीला, गोपींचे प्रेम, गोवर्धनधारण, कालियामर्दन—या सर्व लीलांनी भक्तीचे सौंदर्य प्रकट केले.

परंतु भगवंताची करुणा कधीही दुर्बलता नसते.

जेव्हा अधर्म मर्यादा ओलांडतो, तेव्हा तीच करुणा धर्मरक्षणासाठी तेजस्वी रूप धारण करते.

याच तत्त्वाचे प्रतीक म्हणजे सुदर्शनचक्र. 'सुदर्शन' म्हणजे शुद्ध दृष्टी, सत्याचे दर्शन. त्यामुळे सुदर्शनचक्र हे केवळ युद्धातील अस्त्र नसून ईश्वराच्या अचूक न्यायाचे आणि धर्मरक्षणाच्या संकल्पाचे प्रतीक आहे.

श्रीमद्भागवतामध्ये अनेक प्रसंगी भगवान श्रीकृष्ण सुदर्शनचक्राने अधर्माचा नाश करतात. शिशुपालाचा उद्धार, नरकासुरवध, बाणासुरावरील विजय—या प्रत्येक प्रसंगात सुदर्शनचक्राने केवळ दुष्टांचा विनाश केला नाही, तर धर्माची प्रतिष्ठाही केली.

भगवान परशुराम हे स्वतः विष्णूंचे आवेशावतार मानले जातात. त्यांनी अधर्मी क्षत्रियांचा दर्प मोडला; तर श्रीकृष्णांनी धर्माधिष्ठित राज्यव्यवस्थेची पुनर्स्थापना केली. दोघांचे कार्य वेगळे असले, तरी ध्येय एकच होते—धर्माचे रक्षण आणि सज्जनांचे पालन.

समर्थ रामदासस्वामी म्हणतात—

"धर्मासाठी मरावे । मरोनि अवघ्यासि मारावे ।
मारिता मारिता घ्यावे । राज्य आपुले ॥"

याचा अर्थ हिंसेचे समर्थन नव्हे; तर धर्मरक्षणासाठी आवश्यक ते धैर्य, त्याग आणि कर्तव्यभाव स्वीकारणे होय.

(क्रमश:)

## विचार ते विजय

लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013



### मन जिंका, जग आपोआप जिंकाल

आपल्याला आयुष्यात मोठं व्हायचं असतं. पैसा हवा असतो... मान-सन्मान हवा असतो... यश हवं असतं... लोकांनी आपलं कौतुक करावं असं वाटतं. पण या सगळ्याच्या मागे धावताना आपण एक गोष्ट विसरतो— माणूस जिंकण्यापेक्षा त्याचं मन जिंकणं अधिक महत्त्वाचं आहे.

पैशाने एखाद्याला आपल्यासोबत ठेवता येईल...

पदामुळे लोक आपल्याला सलाम करतील...

पण मनापासून प्रेम करणारा माणूस केवळ आपल्या स्वभावामुळे मिळतो.

"जग जिंकण्यासाठी मोठी शक्ती लागत नाही; माणसाचं मन जिंकण्यासाठी खरं मन लागतं.

लक्षात ठेवा— माणसाला तुमची वस्तू नाही, तुमचं आपलेपण लक्षात राहतं.

कधी कुणाला मनापासून ऐकून घेणं म्हणजे मन जिंकणं. कधी चूक झाली तर अहंकार बाजूला ठेवून "माफ कर" म्हणणं म्हणजे मन जिंकणं. कुणी पडला असेल तर त्याचा हात धरून उठवणं म्हणजे मन जिंकणं.

कुणाच्या यशाचा मनापासून आनंद घेणं म्हणजे मन जिंकणं.

आणि कुणी दुःखात असेल तेव्हा मोठे सल्ले न देता फक्त त्याच्या बाजूला शांतपणे बसणं— हेही मन जिंकणंच असतं.

आजच आपल्या माणसांना सांगा "तू माझ्यासाठी महत्त्वाचा आहेस." कधी कौतुक करा.

कधी मिठी मारा. कधी फक्त ऐका.

कारण माणसाच्या मनात जागा मिळवण्यासाठी मोठं व्यक्तिमत्त्व असण्याची गरज नाही... मोठं मन असण्याची गरज आहे.

जग जिंकण्याच्या शर्यतीत अनेकजण पुढे जातात.

पण शेवटी ज्याच्याभोवती प्रेम करणारी माणसं असतात...

तोच खरा विजेता असतो. तुमच्याकडे पैसा कमी असू शकतो. पद नसू शकतं. प्रसिद्धी नसू शकते.

पण तुमच्या एका शब्दाने कुणाला आधार मिळत असेल... तुमच्या उपस्थितीने कुणाला सुरक्षित वाटत असेल... आणि तुमच्या अनुपस्थितीत कुणाला तुमची आठवण येत असेल...

तर समजा - तुम्ही खूप श्रीमंत आहात.

"माणसाला जिंकण्यासाठी शब्दांची गरज नसते; कधी कधी फक्त मनापासून दिलेली साथ पुरेशी असते.जेव्हा तुम्ही स्वतःच्या चंचल आणि भ्याड मनाला जिंकून आत्मविश्वासाचा ध्वज फडकवाल, तोच तुमच्या आयुष्यातील सर्वात मोठा 'विजय' असेल!

हा विजय तुम्हाला पराभवाच्या गर्तेतून काढून यशाच्या शिखरावर बसवेल. बाहेरील जग हे तुमच्या आतल्या मनाचा फक्त एक आरसा आहे. आत विजय मिळवा, बाहेर संपूर्ण जग तुमचे स्वागत करायला तयार उभे राहील... कारण हाच 'विचार ते विजय' या प्रवासाचा खरा आणि अंतिम गाभा आहे!

# साधनेच्या प्रवासात मानसिक स्थिरता महत्त्वाची


**ज्योतिर्मय साहित्य**

मानवी मनाच्या दोन प्रकारांचे अधिक तर वर्णन आढळते : पारदर्शक मन आणि अपारदर्शक मन. मनाचे हे असे असणे माणसाच्या वृत्ती आणि प्रवृत्ती वर अवलंबून आहे. संवेदनेची पाच इंद्रिय आहेत . ती आपल्याला आहेत म्हणून आपणही पंचेंद्रिय जीव राशीमध्ये येतो.( विश्वामध्ये एक ते पाच असे संवेदन इंद्रिय असलेल्या जीव राशी आहेत) पण मनुष्याला सहावे विशिष्ट इंद्रिय आहे ते म्हणजे मन. म्हणून शास्त्रामध्ये मनुष्याचा समनस्क जीव असा उल्लेख येतो. जगातील असंख प्राणी जीव अमनस्क आहेत. त्यांना मन मिळालं नाही. मनुष्याला मन आहे म्हणून इष्ट अनिष्ट वर्तवणुकीची अपेक्षा आहे.

हे सहावे इंद्रिय मन अदृश्य आहे, म्हणून त्याला अदृश्य म्हटलेले आहे. इतर इंद्रिय नाक, कान, डोळ्य सारखे ते शरीरावर दिसत नाही. मानसशास्त्रानुसार या मनाच्या उथळ आणि खोल अशा अवस्था असतात. कर्मशास्त्रानुसार पूर्व संचित कर्म आणि संस्काराप्रमाणे वृत्ती आणि प्रवृत्ती असतात.

तात्विक व्याख्यान, प्रवचनातील एक उदाहरण आहे : एक ओला घडा/ (मातीचा माठ) आहे, एक कोरडा घडा आहे. हवा आली. हवेमधील धूळ दोन्ही घड्यांवर बसली. जो कोरडा घडा होता त्यावरील धूळ हवेच्या दुसऱ्या सहज झुळूकेसरशी निघून गेली. पण जो ओला घडा होता, त्यावरील धूळ तशीच राहिली. त्याला पाणी टाकून स्वच्छ धुवावी लागेल. म्हणजे परिश्रम मेहनत लागेल.

पारदर्शक मनावर ही बाहेरील प्रवृत्ती, इतरांचे द्वारे कृत, कारीत अनुमोदित घटना, आणि पूर्व संचित कर्माची धूळ सहज निघून जाते.




याउलट दुसरा प्रकार. ओल्या घड्यावर बसलेली धूळ मोठ्या परिश्रमाने काढावी लागेल.

सांगण्याचा अर्थ असा की पारदर्शक मन असलेल्या जीवाला मुक्तीसाठी फार कठीण साधना करावी लागणार नाही, तर अपारदर्शक मन असलेल्या जीवाला मुक्ती अत्यंत सुदूर अशी असते व त्याला कठीण परिश्रम साधना करावी लागेल.

मानवी मन हे संसार आणि मुक्ती दोन्ही अवस्थेचे कारणीभूत असते. म्हणून आपले मन कलुशीत नसावे. त्यावर राग,द्वेष ,लोभ, मोह, मान, अभिमान,अहंकार इत्यादी आत्मशत्रूंचा ताबा नसावा. स्वच्छ मोकळ्या मनाने जगात आपले कार्य करत जगल्यास नवीन कर्म बांधली जाणार नाहीत व जुन्या संचित धर्मांचा नाश करणे अधिक सुलभ होईल.

कर्म बंधाचे आणि मूर्तीचे दोन्हीचे कारण मन आहे. मानवी जीवनाचा मुख्य उद्देश आत्ममुक्ती ची वाट मनाच्या मार्गाने जाते. मन स्थिर असेल तर ही वाट सोपी. मन चंचल असल्यास कठीण. म्हणूनच चंचल मनास लगाम लावण्यासाठी व्रत,नियम, आचरण अशा अनेक क्रिया सांगितल्या जातात. शारीरिक चंचलता दूर झाल्यास मनाची एकाग्रता साधली जाते. आणि मग पुढे साधना पथ साधला जातो.

म्हणूनच मानवी जीवन जगत असताना, अध्यात्मिक मार्गाचे क्रमण करत असताना, साधना पथावरील गतीचे नियमन मनाच्या स्थिरतेवर अवलंबून असते. मन स्थिर असल्यास पाच इंद्रिये काबूमध्ये अर्थातच आपल्या नियमनात, वश राहतात. आणि परिणाम स्वरूप आत्मिक उज्वला तिकडे साधनेचा प्रवास निरंतर होऊन शुद्ध आत्म अवस्था प्राप्त होण्यास मदत होते.





# आयुष्य नुसते जगू नका तर ते सुंदर करून जगा

**ज्योतिर्मय साहित्य**

या पृथ्वी तलावरील प्रत्येक व्यक्ती जीवन जगण्यासाठी सारखी धडपड करीत असतो. बहुतेक व्यक्तींचा कल आयुष्य जगणे,इकडेच अधिक असतो.

मला माझ्या आयुष्य जगता यावे, मी व माझा परिवार सुखी जगो एव्हढेच अशा व्यक्तीचे जीवन जगण्याचे उद्धिष्ट असते. मात्र आयुष्य केवळ स्वतःसाठी जगण्या सोबत इतरांसाठी ही जगावे याला खर आयुष्य जगणे म्हणतात. माणूस किती जगला याला अर्थ नाही तर तो कसा जगला? समाजाच जे देणं लागत ते पूर्णत्वास नेले का? समाजासाठी काही केले का?समाजाच्या

ऋणातून मुक्ती झाली का? या बाबत ही विचार करून जगन हे खरे व्यक्ती जीवनाचे सार्थक होय.आपलं आयुष्य सुंदर पणे कसे जगता येईल ?हे व्यक्ती जीवनात महत्वाचे असते. पशु, पक्षी, कीटक, प्राणी सर्वच जगतात पण व्यक्तीचे जगणे त्यांच्या पेक्षा वेगळे जगणे असते,हे विसरून चालणार नाही. आयुष्य जगायला पैसा जोडावा लागतो, हे जरी खरे असले तरी सुंदर, मंगल, शुभ, समाधानी, आनंदी आयुष्य जगण्यासाठी मात्र चांगली व सद्गुणी माणसाचं जोडावी लागतात, हे कदापिही विसरून चालणार नाही. या भूतलावरील प्रत्येक व्यक्तीला सांगावेसे वाटते की, ''आयुष्य नुसतं जगू नका तर ते सुंदर करून जगा''व जगण्याचा आनंद घ्या. सुंदर आयुष्य जगण्यासाठी माणसं जोडा, सकारात्मकता बाळगा, सर्वांचे हित जपा, एक दुसऱ्याच्या सुख, दुःखात सहभागी व्हा, सदविचार मनी बाळगा, सदवर्तन सद संगती, सदभावना, सतकृती स्वीकारा, व्यसन व विकारांपासून दूर रहा यातून तुम्ही सुंदर जीवन जगू शकता.




# प्रत्येकाने नेत्रदान संकल्प करणे आणि नेत्रदान जनजागृतीसाठी चळवळ उभारणे ही काळाची गरज – डॉ अनिल दुधभाते

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे – २५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर दरम्यान देशभरात नेत्रदान जनजागृती पंधरवडा साजरा केला जात आहे. या निमित्ताने डॉ. दुधभाते नेत्रालय अँड रेटिना सेंटर, पुणे यांच्या वतीने नेत्रदान जनजागृतीच्या कार्यात प्रेरणा दूत म्हणून योगदान देणाऱ्या तसेच रुग्णांना उत्कृष्ट नेत्रसेवा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या पुण्यातील निवडक ऑप्टिशियन व्यावसायिकांचा २५ ऑगस्ट रोजी विशेष सत्कार करण्यात आला.



डॉ. दुधभाते नेत्रालयात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. कार्यक्रमास सहायक पोलीस आयुक्त श्री. विजय कुंभार, पुणे मनपाचे विद्यमान नगरसेवक श्री. प्रसन्नदादा जगताप, विद्यमान नगरसेवक श्री. श्रीकांत जगताप, तसेच माजी नगरसेवक व सामाजिक कार्यकर्ते श्री. अशोक हरणावळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. दुधभाते नेत्रालयाचे संचालक व प्रख्यात नेत्रतज्ज्ञ डॉ. अनिल दुधभाते यांनी उपस्थित मान्यवरांचा शाल व त्यांच्या स्वलिखित डोळ्यांच्या आजारावरील सुंदर असे स्वलिखित 'नेत्रकोष' या पुस्तकाची प्रत देऊन सन्मान केला.

यानंतर श्री. गिरीश वसेकर यांनी प्रभावी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश, नेत्रदानाचे महत्त्व आणि समाजामध्ये नेत्रदानाबाबत जनजागृती निर्माण करण्याची गरज याविषयी विचार मांडले आणि आजच्या कार्यक्रमाचे महत्व विषद केले. तसेच डॉ दुधभाते नेत्रालयाच्या १५ वर्षाच्या आजवरच्या प्रवासात डॉ अनिल दुधभाते यांनी एक लाखापेक्षा जास्त शस्त्रक्रिया, एक हजारा पेक्षा जास्त मोफत नेत्रचिकित्सा शिबिरे आणि सहा लाखापेक्षा जास्त रुग्णांची नेत्र तपासणी केली आणि सर्वाना स्पष्ट आणि सुंदर दृष्टी दिली याचा सर्वांना आनंद असल्याचे सांगितले. यावेळी उपस्थित मान्यवरांनीही मनोगत व्यक्त केले. श्री. प्रसन्नदादा जगताप यांनी डॉ. दुधभाते नेत्रालयाच्या उत्कृष्ट सेवेचे कौतुक करताना स्वतःच्या डोळ्यांचे ऑपरेशन याच नेत्रालयात झाल्याचे अभिमानाने सांगितले. ''आज मला चष्म्याविना अतिशय छान दिसते,'' असे सांगत त्यांनी डॉ. दुधभाते व त्यांच्या संपूर्ण टीमचे विशेष आभार मानले.

श्री. श्रीकांत जगताप तसेच श्री. अशोक हरणावळ यांनीही डॉ. दुधभाते नेत्रालयाच्या उत्कृष्ट नेत्रसेवेचे आणि सामाजिक बांधिलकीतून सुरू असलेल्या नेत्रदान जनजागृती अभियानाचे कौतुक केले.

यानंतर डॉ. दुधभाते नेत्रालयाचे संचालक डॉ. अनिल दुधभाते यांनी भारतातील नेत्रदानाची गरज, उपलब्ध नेत्रांची संख्या, नेत्रदानाबाबत समाजात असलेले गैरसमज आणि जनजागृतीचे महत्त्व याबाबत महत्त्वपूर्ण माहिती व आकडेवारी उपस्थितांसमोर मांडली.

''नेत्रदानाच्या माध्यमातून मृत्यूनंतरही एखाद्याच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करता येतो. या महान कार्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेणे आवश्यक आहे व नेत्रदान जनजागृती आणि नेत्रसेवेत मोलाचे योगदान देणाऱ्या ऑप्टिशियन व्यावसायिकांचा सन्मान करणे हे आमचे कर्तव्य आहे,'' असे डॉ. दुधभाते यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष सहायक पोलीस आयुक्त श्री. विजय कुंभार यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात डोळ्यांचे महत्त्व आणि नेत्रदानाचे सामाजिक महत्त्व विशद केले. डॉ. दुधभाते नेत्रालयाच्या माध्यमातून सुरू असलेल्या उत्कृष्ट नेत्रसेवेबरोबरच नेत्रदान जनजागृतीसाठी करण्यात येत असलेल्या प्रयत्नांचे त्यांनी विशेष कौतुक व अभिनंदन केले व विशेष म्हणजे श्री विजय कुंभार सरांनी ही नेत्रदानाचा फॉर्म घेऊन भरून देणार असल्याचे सांगितले.

या सुंदर कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन शीतल हिराळकर यांनी केले, तर तन्मय करंजकर यांनी आभार प्रदर्शन केले.

या प्रसंगी उपस्थित सर्व ऑप्टिशियन व्यावसायिक तसेच मान्यवरांना नेत्रदान संकल्पाचे फॉर्म देण्यात आले. नेत्रदानाचा संदेश समाजाच्या अधिकाधिक घटकांपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

नाश्ता व चहापानाने या प्रेरणादायी कार्यक्रमाची सांगता झाली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रियंका एडके, गणेश मोटे, कोमल भोसले, गौरी निमकर, शीतल हिराळकर, गिरीश वसेकर, मार्केटिंग टीम तसेच डॉ. दुधभाते नेत्रालयातील सर्व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# डेटा-आधारित नवकल्पना : स्मार्ट आणि शाश्वत भविष्याकडे वाटचाल


**ज्योतिर्मय साहित्य**

आजच्या डिजिटल युगात डेटा ही केवळ माहिती नसून नवकल्पना, निर्णयक्षमता आणि शाश्वत विकासाची प्रमुख शक्ती बनली आहे. मोबाईल, सेन्सर्स, इंटरनेट आणि विविध डिजिटल साधनांमधून दररोज प्रचंड प्रमाणात डेटा निर्माण होत आहे. या डेटाचे योग्य विश्लेषण केल्यास भविष्यातील गरजा ओळखणे, संसाधनांचा कार्यक्षम वापर करणे आणि अधिक प्रभावी निर्णय घेणे शक्य होते.

डेटा-आधारित नवकल्पना (डेटा ड्राइव्हन इंनोवाशन ) मुळे उद्योग, शेती, आरोग्य, शिक्षण, वाहतूक आणि प्रशासन अशा विविध क्षेत्रांमध्ये मोठे परिवर्तन घडत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (), मशीन लर्निंग आणि डेटा अनालिटिक्सच्या साहाय्याने प्रक्रिया अधिक वेगवान, अचूक आणि किफायतशीर होत आहेत.

शाश्वत विकासाच्या दृष्टीनेही डेटाचे महत्त्व मोठे आहे. ऊर्जेचा वापर, पाणी व्यवस्थापन, प्रदूषण नियंत्रण, हवामान बदल आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन यासाठी डेटाच्या आधारे प्रभावी नियोजन करता येते. स्मार्ट सिटी, स्मार्ट शेती आणि नवीकरणीय ऊर्जेच्या क्षेत्रात डेटा-आधारित तंत्रज्ञान महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

मात्र, डेटाचा वाढता वापर करताना गोपनीयता, सायबर सुरक्षा, डेटा नैतिकता आणि डिजिटल समानता यांचाही विचार आवश्यक आहे. जबाबदारीने आणि पारदर्शकतेने डेटाचा वापर केल्यास तंत्रज्ञानाचा लाभ समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचू शकतो.



निष्कर्षतः, डेटा हा आधुनिक युगाचा महत्त्वपूर्ण संसाधन आहे. डेटा, तंत्रज्ञान आणि मानवी सर्जनशीलता यांचा योग्य समन्वय साधल्यास अधिक स्मार्ट, समृद्ध आणि शाश्वत भविष्य घडविणे निश्चितच शक्य आहे.






## पुराणातील विश्व : एक चिकित्सक अन्वेषण (भाग-१)

शांडिल्यगोत्रोत्पन्नभालेरावमुकुन्दोऽहम्
छत्रपतीसम्भाजीनगरम्
विद्युतसन्देशसूत्रम्–bhalerao.mukund@gmail.com
भ्रमणभाषक्रमान्क: ८३०८८३५३१३

### पुराणांची पार्श्वभूमी व हिंदू धर्मातील स्थान

पुढे....

त्यामुळे 'पुराण' या साहित्यप्रकाराची रचना आणि व्यापक आशय समजून घेण्यासाठी ही संकल्पना अत्यंत उपयुक्त ठरते.

यातील सर्ग म्हणजे विश्वाची किंवा सृष्टीची उत्पत्ती; प्रतिसर्ग म्हणजे सृष्टीची पुनर्रचना किंवा प्रलयानंतरची पुनर्निर्मिती; वंश म्हणजे देव, ऋषी किंवा राजवंशांची परंपरा; मन्वंतर म्हणजे मनूंच्या आधारे मांडलेले विश्वकालखंड; आणि वंशानुचरित म्हणजे त्या वंशातील प्रमुख व्यक्ती व राजांच्या चरित्रपरंपरा. यावरून एक महत्त्वाची गोष्ट लक्षात येते कि पुराणांची दृष्टी केवळ धार्मिक विधी किंवा देवकथांपुरती मर्यादित नाही. त्यामध्ये विश्वाची उत्पत्ती, कालाची कल्पना, सृष्टीचे चक्र, मानवी वंशपरंपरा आणि सामाजिक स्मृती यांचा एकत्रित विचार केला जातो.

याच कारणामुळे पुराणांचा अभ्यास भारतीय प्राचीन विचारविश्व समजून घेण्यासाठी महत्त्वाचा ठरतो. मात्र आधुनिक काळात पुराणांतील प्रत्येक विधानाचे स्वरूप एकसारखे आहे असे मानणे योग्य ठरणार नाही. काही वर्णने धार्मिक - प्रतीकात्मक आहेत, काही आख्यायिकात्मक आहेत, काही वंशपरंपरा किंवा सांस्कृतिक स्मृती जतन करतात, तर काही ठिकाणी विश्वरचना किंवा कालगणनेविषयी विशिष्ट कल्पना मांडलेल्या दिसतात. म्हणूनच पुराणांकडे पाहताना दोन टोकांची भूमिका टाळणे आवश्यक आहे.

एकीकडे पुराणांतील प्रत्येक कथेला आधुनिक विज्ञानाचा थेट पुरावा मानणे योग्य नाही; आणि दुसरीकडे त्यांतील सर्व वर्णने केवळ 'कल्पित कथा' म्हणून नाकारून टाकणेही तितकेच अवैज्ञानिक ठरू शकते. त्याऐवजी ग्रंथाचा संदर्भ, त्याची रचना, भाषिक वैशिष्ट्ये, प्रतीकात्मकता, सांस्कृतिक पार्श्वभूमी आणि त्यातील ज्ञानकल्पना यांचा स्वतंत्रपणे अभ्यास करणे अधिक योग्य ठरेल.

याच वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून पुढे पुराणांतील विश्वरचना, ग्रह-नक्षत्रांचे वर्णन, अंतरांची मांडणी आणि कालगणना यांचा विचार करता येतो. विशेषतः विष्णुपुराणासारख्या ग्रंथांमध्ये आकाशीय विश्वाची जी रचना मांडली आहे, तिचे स्वरूप काय आहे, त्यामागील प्राचीन भारतीय विश्वकल्पना कोणती आहे आणि तिची आधुनिक खगोलशास्त्राशी तुलना करताना कोणती काळजी घ्यावी हा पुढील चर्चेचा महत्त्वाचा विषय ठरतो. अशा प्रकारे पुराणे ही केवळ धार्मिक कथांची पुस्तके नसून भारतीय समाजाच्या विश्वदृष्टी, सांस्कृतिक स्मृती आणि ज्ञानपरंपरेचा एक महत्त्वपूर्ण दस्तऐवज म्हणून अभ्यासण्यास पात्र ठरतात. क्रमशः

भाग-२ - पुराणांची रचना, पंचलक्षणे आणि त्यांचा व्यापक आशय

# मायेच्या हरवलेल्या त्या सावल्या....

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

काळाच्या प्रवाहात आजोबा ,आजी, मामी आणि.. नाहीशी झालेल्या त्या अंगणातल्या सावल्या अशाच एक दिवस नकळत दिसायच्या बंद झाल्या. त्या वाहत्या प्रवाहाप्रमाणे काळ किती बदलतो ना! म्हणजे समय चक्र आहे मान्य आहे.परिवर्तन ही काळाची गरज आहे. आज मावळलेला सूर्याला उद्या पुन्हा यायचे आहे. पण तरीही एखादे वलय चक्र फिरावे तसे ते आकाशातील ढग सरकत सरकत गेले. नि दूर पांगणाऱ्या त्या वाटाना त्यांचे त्यांचे वेद लागले. जवळ असूनही दोन झाडांमधले अंतर अगदी औपचारिक दृष्ट्या किंवा मोज पट्टीत मुजत गेले.

मायची माया (मामा) मायेचे मीलन (मामी)

दारी उगवले उंबराचे फुल


प्रेमाचं ग लडिवाळ बोलणं. खिरपुरी,

पोळी शिकरण, गुळ साखरेची गोडी,

भाचरांच्या मजाकला टित लावते खोडी.

कृष्णेच्या काठची मंद झुळूक आली.

आठवणीत हरवली ती थोडी थोडी.



तो काळा तीट आज औपचारिकतेत बदलला. मागल् दाराला असणाऱ्या त्या दगडी पायऱ्या, कोनाड्यात असलेल्या त्या कपाटात असणाऱ्या वेफर्स चा तो डबा, येता जाता वाटेत येणारे व्हनं, चौकटीतून आत शिरताना उजव्या हाताला असलेले जाते त्याच्या बाहेर असणारी ती मोठीच्या मोठी पडवी कोपऱ्यात असणारा टेबल आणि दूरदर्शनला डिस्कव्हरी चॅनेल ला पाहिलेले ते जंगलातील काही प्राणी, तसेच अंगणात हिरवे पट्टे असणारी ती टीव्हीएस स्कूटर, घराच्या कोपऱ्यात असलेला तो नळ आणि त्या नळाच्या पाण्यावर फुलणारी ती चमेली आणि अबोली तिथेच अंगणात शेजारी असणारा सरांचा ओटा आणि मामांच्या घराजवळील अंगणातल्या लाकडी छप्पारात असलेली ती कॉट आणि त्यावर दाजी, वाहिनी आणि आम्ही खेळणारी भावंडे, जे ते आपापल्या मार्गानी मार्गस्थ झालेले चमेलीच्या फुलांचा वहिनींनी शिकवलेला गजरा त्याचा तो हाताला येणारा सुगंध आजही आठवणीत हरवतो.आणि डोळे ओले करून टाकतो.




मागच्या दाराला वाट पाहणारे ते डोळे.. त्या आसुसलेल्या डोळ्यातला तो भाव ते वात्सल्य आज कुठल्याशा परिवर्तनात हरवून गेले आहे असे वाटत राहते.

कौलारू घरांमधून घुसणारा तो धूर आज औद्योगिकीकरणाच्या आड धूसर झाला. एकाच अंगणात नांदणारी प्रेम, माया, ममता विचारांच्या शृंखलेत तोकडी झाली.

डिजिटलच्या जमान्यात जग जवळ आले पण नाती दुरावत गेली. यावरून एकच म्हणावेसे वाटते.

पूर्वीच्या काळी नाती होती जणू लेकुरवाळी,

डिजिटलाच्या युगात जग आले जवळी,

पण कुटुंबव्यवस्था झाली कोवळी कोवळी.

प्रेम, माया, ममतेची अळीमिळी गुपचिळी,

जो तो स्वतःच्या जीवनात व्यस्त जगण्याची त्याच्या परिभाषाच झाली निराळी.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# रक्षाबंधन...स्नेह आणि दृढ विश्वासाचे रेशमी बंधन

**ज्योतिर्मय साहित्य**

आपली भारतीय संस्कृती खूपच उदात्त, सुंदर, महान आहे. म्हणूनच परदेशातील लोकानासुद्धा याची भुरळ पडते ना!

कारण यात फक्त देव,धर्म,कर्मकांड यांच्या सणवार आणि रूढी,परंपरा,उत्सव यांनाच महत्व दिलेले नाही तर यात भावना आणि श्रद्धेचा विचार करून सामाजिक, धार्मिक, नैतिक मूल्यांनाही तेवढेच महत्वाचे स्थान दिले आहे आणि त्यानुसार सर्व उत्सव, सणवार साजरे केले जातात. यात पती-पत्नी, आई-मुलगा, भाऊ-बहिण अशा नात्यांना खूप महत्व आहे.

राखी पौर्णिमा म्हणजेच रक्षाबंधन हा सुद्धा असाच एक भावा-बहिणीच्या पवित्र नात्याचा सुंदर भावनिक उत्सवच आहे. याला दुहेरी महत्वसुद्धा आहे बरका! आपला बराच भाग सागरांच्याकिनाऱ्यांवर देखील वसलेला आहे.त्यामुळे याच दिवशी तेथील कोळीबांधव हा सण नारळीपौर्णिमा म्हणुन देखील साजरा करतात. यादिवशी ज्या सागराने आपल्याला अन्न,जीवन दिले त्याची जाणीव ठेवून त्याचे ऋण फेडण्यासाठी म्हणून त्याला नारळ,दिवे अर्पण करून नारळाचे गोडाचे पदार्थ बनवून खाऊन, नृत्य करुन गाणी गाऊन आनंदाने हा सण साजरा करतात. म्हणजेच मानव,देव यांच्या इतकेच निसर्गालाही या संस्कृतीत स्थान दिले आहे आणि ही खूपच सुंदर,अभिमानस्पद विशेष गोष्ट आहे.म्हणूनच आपली संस्कृती खूप वेगळी,सुंदर आणि महान आहे.

निसर्गाशी आपले नाते जपण्याच्या सोबतच या दिवसाला भावा बहिणीच्या एकमेकांवरील प्रेमाला विश्वासाचे कोंदण देण्याचा हा अलौकिक सण! भाऊ व बहिणीचे नाते रेशमी धाग्यासारखे नाजूक असते. रक्षाबंधन या सणाला बहिण भावाच्या हातावर राखी बांधते व भाऊ तिला प्रेमाची भेटवस्तू देतो. एवढेच नाही तर तिच्या संरक्षणासाठी खंबीर आहे याची ग्वाहीही देतो.ही राखी म्हणजे केवळ एक रेशमी धागा नसतो,तर बहीण तिचे सुरक्षकवच भावाला बांधत असते. कोणतेही संकट यापुढे टीकाव धरू शकत नाही असे या धाग्याचे खास महत्व आहे. हा तंतु ,राखी बांधून बहीण त्याला औक्षण करते, त्याचे सर्व मंगल व्हावे,दीर्घायुष्य लाभावे यासाठी प्रार्थना करते, गोड बनवून खायला घालते तर भाऊसुद्धा तिच्यावर येणाऱ्या कोणत्याही कठीण प्रसंगात, संकटात आयुष्यभर तिच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचे मनोमन आश्वासन देतो.

हा सण अगदी पुराण काळापासून सुरु असल्याचे कित्येक दाखले आहेत. चिंधी बांधते द्रौपदी हरिच्या बोटाला ही महाभारतातील कथा श्रीकृष्ण व द्रौपदीच्या भाऊ बहिणीच्याएकमेकांवरील असलेल्या प्रेम,विश्वास,श्रद्धा, आदर,त्याग यांचे दर्शन घडवते. प्रेमाने बांधलेल्या एका चिंधीसाठी हरी तिच्यावरील कित्येक अत्यंत कठीण प्रसंगात धावून येतो, रक्षण करतो. वस्त्रहरणाच्या कठीण प्रसंगात अगदी भीष्माचार्य, कुलगुरू, धृतराष्ट्रासारखा राजा सुद्धा काहीही करु शकला नाही तेंव्हा बहिणीच्या एका हाकेला तिने बांधलेल्या एका धाग्याची आठवण ठेवून तिचा भाऊ श्रीकृष्ण फक्त आलाच नाही,तर एका धाग्याच्या बदल्यात कित्येक उंची वसने देऊन तिचेलज्जारक्षण केले. हे पाहून या धाग्यात किती ताकद असते याची प्रचिती येते.सख्खी बहिण सुभद्रा इतकी माया, प्रेम केवळ या धाग्यामुळेच द्रौपदीसारख्या एका मानलेल्या बहिणीला सुद्धा मिळते.पुरातन काळात, जेव्हा स्त्री स्वतःस असुरक्षीत वाटायचे तेव्हा ती अशा



व्यक्तीस राखी बांधून भाऊ मानत असे, जो तिची रक्षा करील.

दानवांचा राजा वृत्रासूर याने देवांचा राजा इंद्र याला युद्धाचे आव्हान दिले. इंद्र आपले वज्र घेऊन युद्धास निघाला. त्या वेळी इंद्राला विजय मिळावा म्हणून त्याची पत्नी शुची हिने विष्णूकडून मिळालेला एक दोरा (राखी) इंद्राच्या हातावर बांधला. त्या राखीच्या प्रभावाने इंद्राला त्या युद्धात विजय मिळाला व त्याचे गेलेले वैभव प्राप्त झाले. त्या दिवशी श्रावण पौर्णिमा होती. तेव्हापासून रक्षाबंधनाचा सण सुरू झाला असे म्हणतात. ऐतिहासिक काळात चित्तोडच्या राणी कर्मवतीने हुमाँयू बादशहाला राखी पाठवली व हुमाँयू बादशहाने पण आपल्याबहिणीचे परकीय आक्रमणापासून संरक्षण केले.समाजात ऐक्य आणि प्रेमभाव वाढीस लागावा यासाठी रक्षाबंधनाचा सण रजपूत लोकांत रूढ झाला.राजपूत स्त्रिया आपल्या शत्रूंच्या हातात राखी बांधून पुढे होणारा भयंकर संहार टाळीत असत व एकप्रकारे राखीचा उपयोग अहिंसेसाठी करीत असत. सण भारताच्या अनेक प्रांतांत साजरा केला जातो. हा राजस्थानचा प्रमुख सण आहे या पौर्णिमेला पोवती पौर्णिमा असेही म्हणतात.राखीचा धागा हा देखील नुसताच सुताचा दोरा नसून ते एक शील, स्नेह, पवित्रतेचे रक्षण करणारे, सतत संयमी ठेवणारे पुर्षार्थाचे पवित्र बंधन आहे. ह्या एवढयाशा धाग्याने कित्येक मने जुळून येतात. त्यांना भावनांचा ओलावा मिळतो वं मन प्रफुल्लीत होते.

स्त्री कितीही मोठी, मिळवती झाली तरी तिच्या रक्षणाची जबाबदारी तिच्या भावावरच आहे हेच ती यातून त्याला सुचवू इच्छिते. यात तिचा दुबळेपणा नसून भावाच्या कर्तृत्वावरचा विश्वास दिसून येतो. रक्ताचे नाते असणारे भाऊ बहिण असोत किंवा मानेलेले असो, पण या नात्यामागची भावना पवित्र व खरी आहे. यात कुठेही फसवणूक नाही. त्यामुळेच तर भाऊ नसणारी स्त्री चंद्राला आपला भाऊ मानते व त्याला ओवाळते. आई आपल्या मुलाला चंदामामा म्हणूनच चांदोबाची ओळख करून देते. म्हणून तरी कित्येक सामाजिक कार्यकर्ते अनाथाश्रम, दिव्यांग भगिनींकडुन खास राख्या बांधून घेतात. त्यांना आधार देतात. प्रेमाने भेटवस्तू देतात. आपल्या मुख्यमंत्री साहेबांनी म्हणूनच तर लाडकी बहीण योजना सुरु केली. त्यांना आयुष्यभर फुल ना फुलाची पाकळी मिळावी यासाठी चोळी बांगडीसाठी आर्थिक मदत सुरु केली. त्यामुळे त्यांना खूप मोठा दिलासा, आधार मिळाला. कित्येकजणी त्यामुळे आता स्वतःच्या पायावर सक्षमपणे उभ्या राहिल्या आहेत.

हा उत्सव लहानांपासुन ते वृद्धांपर्यंत सर्वजण आनंदात साजरा करतात. छोट्याश्या बहिणीपासून ते सासरी गेलेल्या बहिणींपर्यंत,अगदी मानलेल्या बहिणीसुद्धा या



**सौ. स्नेहा मुसरीफ,**
पुणे

दिवशीआवर्जून भावाला भेटतात. जुन्या, लहानपणी घडलेल्या दोघांमध्ये घडलेल्या गमतीच्या, प्रेमाने दोघांनी एकमेकांची घेतलेली काळजी, प्रेम,कधी लटकी केलेलीभांडणे, रुसणे, मनवणे सारे काही अशा प्रसंगी आठवून मजा येते. भेटण्यामुळे प्रेम वाढते. प्रेमाने भावाने दिलेली भेट बहिणी जीवापाड जपतात.अभिमानाने मिरवतात. आईचे प्रतिबिंब म्हणजे तिची मुलगी असे मानले जाते. म्हणूनच आई आणिमुलाच्या नात्याइतकेच सुंदर आणि पवित्र,जवळचे नाते भाऊ..बहिणीचे! शाळेत,कॉलेजमध्ये हा भाऊ एखाद्या बॉडीगार्ड सारखा स्ट्राँग वाटतो,तर बहिणीची पाठवणी करताना तितकाच हळवा असतो. हे नाते काही विलक्षणच असते. या नात्यातील गंमत, ओढ, प्रेम,आदर, त्याग, काळजी या सर्व सुंदर गोष्टींचा संगम इतर कुठल्याच नात्यात नाही. सामाजिक ऐक्याची भावना जागृत ठेवण्यासाठी अशा प्रकारचे सण खूप महत्वाचे ठरतात. रक्ताच्या नात्याव्यतिरिक्त आपल्या मनाप्रमाणे सुंदर, प्रेमाची नाती जोडण्यास ह्या सणामुळे आपल्याला संधी मिळते. ज्या समाजात अशा प्रकारची एकरूपता, ऐक्य, आदर, प्रेम,असते असा समाज सामर्थ्यशाली बनतो हाच या राखी पौर्णिमेचा संदेश आहे.

पूर्वी फोन,इंटरनेट , कुरिअर या सुविधा नव्हत्या तेंव्हा दूर ,परगावच्या बहिणीना राखीपौर्णिमेला भावाला येऊन राखी बांधणे शक्य नसेल तेंव्हा पोस्टाने या राख्या पाठवायच्या. भाऊ देखील या पोस्टमनची अगदी आतुरतेने वाट पाहायचा. पोस्टमन म्हणजे अगदी देवदूतच होता. आणि पोस्टमनदादा सुद्धा कितीही ताण असला तरीभावाबहिणीच्या प्रेमाचा आदर ठेवून वेळेत ती पोहोचती करायचा. हल्लीच्या धकाधकीच्या काळात लहानपणी चिंचा, बोरांवरून ते अगदी आईच्या बाजूला कोण झोपणार यावरून भांडणारे ताई-दादा आता परस्परांना ई-पत्र, फोन किंवा चॅटद्वारे भेटण्याचा व राखी पौर्णिमा एकत्र साजरा करण्याचा आनंद उपभोगतात. द्रौपदीने आपल्या मानलेल्या भावाला (कृष्णाला) बांधलेली जरतारी शेल्याची चिंधी, गरीब बहिणीने भावाच्या हातात बांधलेला धागा किंवा शाळकरी ताईने तयार केलेली राखी, राजपूत रमणीने बाजूच्या राजाला पाठवलेले राखीचे ताट, श्रीमंत बहिणीने भावाला बांधलेली सोन्याची किंवा चांदीची राखी काय किंवा आज इंटरनेटच्या माध्यमातून बहिणीने भावाला पाठवलेली ई-शुभेच्छापत्रसहित राखी काय या सर्वांमागे भावना एकच आहे ती म्हणजे भावाबहिणींचे परस्परांवरील प्रेम! आपल्या बरोबरंच आपल्या देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिक बांधवांना भगिनी प्रेमाने राख्या बांधतात. आपल्या पाठीशी राहुन रक्षण करणाऱ्या देवानासुद्धा महिला राख्या बांधतात.

राजस्थान,गुजरात,मध्य प्रदेश या सारख्या राज्यांमध्ये बहिणींना भावाकडे जाण्यासाठी सोय म्हणून या दिवशी सर्व महिलांना बससेवा मोफत असते. आता जाहिरातीचा जमाना असल्यामुळे या सणाच्या निमित्ताने कुछ मिठा होजाये सारख्या असंख्य सुंदर जाहिराती ठिकठिकाणी झळकत असतात. बँक, सरकारी ऑफिसेस यानिमित्ताने कित्येक सुंदर योजना राबवतात. कित्येक ज्वेलर्स सोन्याचांदीच्या आकर्षक राख्या बनवून त्यांच्या जाहिराती करतात. कित्येक इव्हेन्टस् साजरे होतात. आता स्त्रीया खूप सक्षम ,जागरूक झाल्या आहेत. स्वतःचे रक्षण,काळजी घेण्यास समर्थ झाल्या आहेत. असे असले तरी अजूनही हुंडाबळी, महिलांवर होणारे अत्याचार, त्यांचे शोषण या गंभीर समस्या नष्ट झालेल्या नाहीत.

बरेचदा केवळ दिखाव्यासाठी रक्षाबंधन - इव्हेन्टस या एका दिवसापुरते साजरे केले जातात. हे तेवढ्यापुरते न करता मनापासून जबाबदारीने मानलेल्या भगिनींचे रक्षण केले जाईल, त्यांच्या समस्या सुटतील तेंव्हाच हा सण साजरा करण्याचा हेतू सफल झाला असे म्हणता येईल.

# बालपणी हसून-खेळून असलेले बहीण भाऊ आत्ताही तसेच राहा... हेच खरं ‘‘रक्षाबंधन‘‘

**ज्योतिर्मय साहित्य**

आजचं युग म्हणजे अतिशय धावपळीचं युग. आणि या धावत्या युगात प्रत्येकजण मी, माझं, मला यातंच आणि याच ओझ्याखाली आणि हेच ओझं डोक्यावर घेऊन जगत आहे. मी, माझं, मला म्हणत म्हणत माणुस आपली जिवाभावाची, जवळची नाती दूर करतो आहे, बाजूला सारतो आहे. या सगळ्यात महत्वाचा वाटतो आहे तो म्हणजे पैसा. पैशाच्या मागे धावताना माणुस हा विचार सोडून दिला आहे कि माझी नातीगोती आहे, माझी आपली माणसं आहेत. खरंच काय काळ होता आधीचा. तेव्हा पैसा नव्हता पण एकमेकांबद्दल प्रेम, माया, जिव्हाळा, आपुलकी, स्नेह होतं.


त्या काळात साध्या दोऱ्याच्या राखीला फार मान होता. पण आत्ता राखी सोन्याची जरी बांधली तरी त्यातून एक वेगळाच अर्थ काढला जात आहे. एकाच आईवडिलांच्या पोटी जन्म घेतलेले बहीण भाऊ लहानपणी कसे एकाच ताटात खात होते त्या खाणाऱ्या प्रत्येक घासात प्रेम होते. एकमेकांना मायेनं, प्रेमानं घास भरवणाऱ्या त्या हातात प्रेम होते. खेळताना बहिणीला ठेच लागली कि भाऊ धावत पळत जाऊन हळद आणून बहिणीच्या जखमेवर लावत होता, बहिणीच्या वेदनादायी जखमेवर मायेची फुंकर मारत होता. लहानपणी बहिणीने भावाला राखी बांधली कि भाऊ एक-दोन रुपये किंवा टिकली पॉकेट देत असत. त्या वस्तूंमध्ये अफाट प्रेम, माया होती.

रक्षाबंधन जवळ आले कि बहिणींची कसरत चालायची कि, मी भावासाठी ही राखी घेणार, मी ती राखी घेणार. भावाच्या हातावर ती राखी खुप सुंदर दिसेल म्हणून खुप आवडीने बहिणी राखी घेत असत. लहानपणी बहिणी भावांचं प्रेम बघून आईवडिलांच्या डोळ्यात अश्रू येत



असत. आईवडिलांच्या मनात आपसूकच इच्छा जागी व्हायची. कि आपल्या मुलांचं हे प्रेम असंच कायम असावं, भावा बहिणीचं प्रेम असंच टिकून राहावं. आईवडिलांच्या त्या इच्छेचा मान राखून, मान ठेऊन मोठे झालेले बहिण भाऊ जर आजही तसेच एकमेकांवर प्रेम करत, समजून घेत मिळून मिसळून, आनंदाने, एकत्र राहिली तर पैशासारखी गोष्ट दूर होईलंच. रक्षाबंधन हा कांही केवळ एक सण नाही.

दूर गेलेल्या बहिणी भावाला जवळ आणून त्यांच्यातील प्रेम जागे करुन त्यांना बहिण भाऊ या नात्याची जुनी आठवण करून त्यांना राखीच्या धाग्यात बांधून ठेवणारा सण आहे. बहीण भावाचं नातं प्रेमाचं असतं त्या नात्याला गैरसमज मनात ठेऊन तात्पुरतं ओढून ताणून बांधण्याचा प्रयत्न करू नका. प्रत्येक बहिणीला भावाची खंबीर साथ, भावाचं प्रेम महत्वाचं असतं. सध्या पैशामुळे बरीच नाती मातीमोल झाली आहेत. म्हणून तो पैसा बाजूला ठेवा.



**सौ. मनीषा सोन्नेकर/सोनकांबळे**
**देगलूर. जि. नांदेड**
**मो.** 9960028899


कितीही झालं तरी तो कागदी पैसा आहे. त्या कागदी पैशाने आपण जरी कांहीही विकत घेत असलो तरी वादामुळे दूर गेलेल्या किंवा दूर झालेल्या बहीण भावाचं नातं पैशाने कधीच विकत घेता येत नाही.

लहानपणी एकत्र असलेली बहीण भाऊ मोठी झाल्यावर पाहुणी होतात. हा दुराव्यातील पाहुणचार बहीण भावाच्या नात्यात न ठेवता अजूनही एकमेकांसाठी तसेच राहा जसे लहानपणी होतात. बहिणीला सासरघरी जर कांही त्रास होत असेल तर तिला वेळोवेळी विचारत चला, तिला धीर देत चला, तिच्या डोळ्यांतील अश्रू पुसत चला. कारण पृथ्वी तलावरील प्रत्येक बहीणीसाठी एकमेव भाऊच असा एक व्यक्ती असतो जो बहिणीसाठी वाट्टेल ते करुन बहिणीच्या पदरात सुखं टाकीत असतो.

पैसा, प्रॉपर्टी सगळं बाजूला ठेऊन बहिणीसाठी सदैव उभे रहा, एकमेकांना मदत करत राहा, एकमेकांना समजून घ्या, गैरसमजामुळे झालेल्या वादाला दूर सारून प्रेमानं जवळ या, एकमेकांना सुखः, दुःख विचारत राहा, दारात आलेल्या बहिणीला प्रेमानं आत घ्या, बहिण भावाच्या तुमच्या नात्यावर मायेची फुंकर मारा. पैसा महत्वाचा नसून बहिण भाऊ हे दोघे एकमेकांसाठी महत्वाचे आहेत, पैशापेक्षा बहीण भावाचं नातं अतूट राहणं हे महत्वाचं आहे. बहीण भाऊ या निर्मळ, पवित्र नात्यातील घट्ट वीण तशीच प्रेमानं बांधून ठेवा.

राखीसाठी माहेरी आलेल्या बहिणीला आपलेपणाची घट्ट मिठी मारा. एकमेकांना म्हणा कि, ‘‘आपण जसे लहानपणी एकत्र वाढलो, खेळलो तसेच आत्ताही तसेच राहू. या आपल्या नात्यातील आपल्या प्रेमाचा धागा असाच घट्ट बांधत राहू‘‘. गैरसमज दूर करुन भावा बहिणीच्या नात्यात प्रेम भरण्यासाठीच राखी सण येतो. आणि भावा बहिणीला जवळ आणतोच. कारण जगातील सगळी नाती एकीकडे आणि बहीण भावाचं नातं एकीकडे. बहीण भावाच्या नात्यातील प्रेम कधीच कमी होणार नाही याची काळजी भाऊ बहीण दोघेही घ्या. हेच तर खरं रक्षाबंधन होय.

# रक्षाबंधन - विश्वासाचा धागा



**ज्योतिर्मय साहित्य**

परिवारातील प्रत्येक नाते कसे जोपासावे याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे जणू भारतीय संस्कृती. भाऊ बहिणीचे प्रेम, ऐक्य व विश्वासाचे प्रतीक असणारा रक्षाबंधन सण श्रावण महिन्यातील पौर्णिमेला येतो. या दिवशी बहीण भावाच्या मनगटावर राखी बांधून तो दीर्घायुषी होण्यासाठी प्रार्थना करते. भाऊ तिला ओवाळणी टाकून तिच्या रक्षणाचे वचन देतो. घरातली चिमुकली बहीण ‘‘ओवाळते भाऊराया‘‘ म्हणत आपल्या भावाला ओवाळते व उत्सुकतेने ओवाळणी मिळण्याची वाट पाहते. इतकेच नव्हे तर हिंदू बांधव एकमेकांना राखी बांधून परस्पर स्नेहभाव वाढावा व सर्वांनी राष्ट्रकार्यास तत्पर असावे यासाठी हा उत्सव साजरा करतात.

या सणाचे महत्व सांगणारी एक ऐतिहासिक काळातील आख्यायिका अनेकदा सांगितली जाते. बहादूरशहाने मेवाडची राणी कर्मावती वर हल्ला केला. राज्याच्या रक्षणासाठी तीने मुघल बादशहा हुमायून कडे राखी पाठवून मदत मागितली. तेव्हा राखीचा सन्मान राखण्यासाठी तसेच बहीण भावाचे पवित्र बंधन लक्षात घेऊन या लढाईत त्याने उडी घेतली तसेच यशही मिळविले. अशा रीतीने बहिणीला रक्षाबंधनाची एक आगळी वेगळी ओवाळणी दिली. अशीच एक पौराणिक काळातील आख्यायिका सांगितली जाते. त्यानुसार देवासुर संग्रामात देवांचा विजय व्हावा म्हणून देवांचा राजा इंद्र याला बहीण इंद्राणीने राखी बांधली होती. महाभारत काळात अभिमन्यूच्या सुरक्षेसाठी त्याला कुंतीने राखी बांधली होती. असे आहे या रक्षाबंधन सणाचे महत्व.

कारगिल युद्धाच्या वेळचा प्रसंग. युद्धाच्या रम्य कथा शिक्षक शाळेत सांगत होते. काही विद्यार्थिनींनी शूर सैनिकांना राख्या पाठविल्या. या उपक्रमाने त्यांना गहिवरून आले. त्यांनीही उत्तरादाखल प्रतिक्रिया पाठवून आभार मानले. त्यांनी असे सांगितले की,‘‘ आपणं पाठविलेल्या राखीचा आम्ही मान ठेवणार. भारत देशाच्या सीमेचे रक्षण करण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. तुम्ही कुणीही काळजी करू नका. करोडो भारतवासियांच्या सदिच्छा आमच्या सोबत आहेत. अंतिम विजय आपलाच आहे.‘‘ या त्यांच्या आत्मविश्वासाने आपण युद्धात खरंच विजयी झालो. असा हा शूर भावाचा निश्चयी व विश्वासाचा धागा रक्षाबंधन.



**अरविंद कुळकर्णी**
**(सेवानिवृत्त गणित शिक्षक)**
**भ्रमण. - ९८२२६४२२९४**

रक्षाबंधन सणाचे महत्व पर्यावरण संरक्षण संदेश देण्यासाठी सुद्धा पर्यावरणप्रेमींना वाटत असते. विविध उपक्रमांतर्गत वृक्षांना पण राख्या बांधल्या जातात. पर्यावरणात वृक्षांची भूमिका भावापेक्षा कमी नाही. ऊन, पाऊस यापासून रक्षण करण्यासाठी वृक्ष आपणास सावली देतात. फुले व फळे देतात. औषधी गुण सुद्धा असल्याने वेळप्रसंगी उपचार करण्यास उपयोगी पडतात. अन्न,वस्त्र,निवारा देऊन आपल्या रक्षणाची मोठी जबाबदारी झाड पार पाडते.

असा हा सामाजिक बांधिलकी जपणारा,संस्कृती जोपासणारा,एकात्म भावना वाढीस लावणारा,राष्ट्रप्रेम वृद्धिंगत करणारा, स्त्री व पुरुष यांचे पवित्र नाते सांगणारा सण रक्षाबंधन सण ! या सणानिमित्त सर्वांना खूप खूप शुभेच्छा !

# रक्षा बंधन




**ज्योतिर्मय साहित्य**

आज आपण श्रावण महिन्याच्या पौर्णिमेच्या दिवशी साजरा होणारा एक लोकप्रिय आणि महत्त्वाचा सण म्हणजे *रक्षाबंधन* याची माहिती आपण घेणार आहोत.

या दिवशी भारतातल्या बऱ्याच ठिकाणी बहीण आपल्या भावास रक्षाबंधन म्हणजेच राखी बांधते. आणि आपल्या संरक्षणाचे वचन त्याचे कडून घेते. रक्षा बंधनातील रक्षा म्हणजे संरक्षण हे केवळ शारीरिक संरक्षण नसून, धर्माचे, सदाचाराचे, कुटुंबाचे, संस्कृतीचे व आत्म सन्मानाचे संरक्षण ती आपल्या भावाकडून अपेक्षित ठेवते.

पुराणात रक्षाबंधन हे बहिणीने भावास राखी बांधण्याचा कार्यक्रम असे दिसून येत नाही, तर ते राजाला बांधण्याचे पर्व समजल्या जात असे.

अख्यायिका

एकदा देव व दाणवात युद्ध झाले. यात दाणवाचा दारुण पराभव झाला.यामुळे सर्व दाणव निराश झाले .त्यांनी दैत्य राज बळीला सोबत घेऊन दैत्य गुरु शुक्राचार्य यांचे कडे गेले. दाणवांनी आपल्या पराभवाचा पाढा अत्यंत वेदने सह शुक्राचार्या पुढे वाचला. त्यावर शुक्राचार्य त्यांना म्हणाले की, युद्धात कालगती प्रमाणे जय पराजय हा होत असतो. यामुळे तुम्ही दु:खी होऊ नका. या क्षणी तरी तुम्ही देवराज इंद्राशी तह करून शांत बसा, कारण या काळात आपण केलेले कोणतेही प्रयत्न यशस्वी होणार नाहीत. याचे कारण असे की, इंद्र पत्नी शची हिने इंद्राला रक्षा सूत्र बांधून अजय केले आहे. या रक्षा सूत्रा मुळेच तुम्ही पराजित झाला आहात.आता एक वर्ष वाट पहा. त्यानंतर तुमचे कल्याण होईल. असा हा रक्षाबंधनाचा विलक्षण प्रभाव आहे.

या दिव्य व्रताविषयी राजा युधिष्ठिराने भगवान श्रीकृष्णांना विचारले, त्यावर ते म्हणाले की, श्रावण पौर्णिमेस प्रातःकाळी उठून शौच्य वगैरे आटोपून श्रुती स्मृती विधी नुसार स्नान करून, देवता ऋषी पितरे व यम यांना तर्पण करावे.( हा विधी उपाक्रम किंवा श्रावणी या नावाने ही प्रसिद्ध आहे) ही श्रावणी केल्यानंतर राखी तयार करावी. यात कापसाच्या वस्त्रात किंवा रेशमी वस्त्रात अक्षत, पिवळी किंवा पांढरी मोहरी, सोने काळी मोहरी, दुर्वा व चंदन असे पदार्थ ठेवून एक छोटी गाठ बांधावी. हे रक्षा सुत्र एका तांब्याच्या पात्रात (ताम्हणात) ते ठेवावे. यानंतर सारवलेल्या अंगणात एक आसन मांडावे. त्यावर प्रतिष्ठित व्यक्ती किंवा राजा यांना बसवावे. त्यावेळी सर्वांनी प्रसन्न चित्त असावे. मंगल ध्वनी करावा. ब्राह्मण व सुवासिनींनी अर्घ्यआधी देऊन राजाचे पूजन करावे, व राजाला किंवा ज्याला राखी बांधावयाची आहे त्याला, खालील मंत्र म्हणत राखी बांधावी. राखी उजव्या हातात बांधावी

येन बध्धो बलिराजा दानवेंद्रो महाबल:

तेन त्वामभिवध्नामि रक्षे मा चल मा चल

यानंतर ज्याला राखी बांधली आहे, त्याने ब्राह्मणांना सुंदर वस्त्र भोजन, दक्षिणा द्यावी. असे रक्षाबंधन करणारा व्यक्ती वर्षभर पुत्र पौत्र धना नी परिपूर्ण राहतो.

हा सण भारतातल्या विविध ठिकाणी कसा साजरा होतो, हे आपण आता पाहू.

महाराष्ट्र

महाराष्ट्रात नारळी पौर्णिमा म्हणून हा सण साजरा होतो. या दिवशी कोळी समाज समुद्राची पूजा करतो. पावसाळ्यातील मासेमारी थांबवल्या नंतर आता पुन्हा ती सुरू करण्यापूर्वी समुद्राची पूजा केली जाते. त्याला नारळ अर्पण करण्यात येतो. व पुढील काळातील मासेमारीची परवानगी समुद्रास मागीतली जाते.

गुजरात

गुजरात मध्ये या सणाला पवित्रोप्रण म्हणतात. शिव मंदिरात शिवलिंगाला या दिवशी पवित्र धागा अर्पण केल्या जातो व शिवा कडून आपले रक्षण व्हावे अशी विनंती करण्यात येते.

उत्तर भारत

बहिणी भावाला राखी बांधतात. भाऊ बहिणीला रक्षणाचे वचन देतो. कुटुंब या एकत्र येऊन भोजन करतात व भेट वस्तूंची देवाणघेवाण करतात.

राजस्थान

राजस्थान मध्ये *राम राखी आणि *चुडा राखी* या परंपरा आहेत राम राखी ही भगवंताला अर्पण केली जाते तर चुडा राखी ही विवाहित स्त्रीच्या बांगडीला बांधली जाते. असे करून स्त्री ही पुरुषाच्या इतकी संरक्षण देण्यात समर्थ आहे, हा भाव व्यक्त होतो.

*पंजाब* पंजाब मध्ये सलुनो नावाची परंपरा आहे. वाईट शक्ती पासून संरक्षण व्हावे म्हणून इथे रक्षा सूत्र बांधले जाते.

ओडिशा

ओडिषा राज्यात गम्हा पौर्णिमा असे या सणाला म्हणतात. गम्हा शब्द ओडिया भाषेतील गोधन किंवा पशुधन यांच्याशी संबंधित मानल्या जातो. हा सण शेती पशुपालन यांच्याशी संबंधित आहे व कृषीची देवता म्हणून भगवान बलराम हे प्रमुख मानले जातात. भगवान बलराम हे हल म्हणजे नांगर धारण करणारे प्रमुख कृषी वल होते. या दिवशी भगवान बलरामाची पूजा केली जाते. त्याचबरोबर गाई वासरे बैल व पशुधन यांना स्नान घातले जाते.त्यांना सजवले जाते आणि त्यांच्या आरोग्य आणि संरक्षणासाठी भगवंताकडे प्रार्थना केली जाते.

दक्षिण भारत

तामिळनाडू केरळ आंध्र प्रदेश आणि कर्नाटक येथे किंवा उपाक्रम श्रावणी साजरी केल्या जाते.

प.बंगाल

या सणाला इथे झूलन पौर्णिमा असे म्हणतात या दिवशी राधा कृष्णाला झोक्यावर बसून उत्सव साजरा केल्या जातो.

श्रावणी

आपले जीवन उत्तम चालते, त्यासाठी आपल्याला ऋषींनी केलेले कार्य आपल्या जीवनाला त्यांनी दिलेली दिशा ही अत्यंत उपयोगी पडत असते. म्हणून आपणास देवतांचे ऋण, ऋषींचे ऋण, पितरांचे ऋण व यमाचे ऋण व्यक्त करणे व



आपल्याजवळ कृतज्ञता भाव बाळगणे हे गरजेचे असते. या दिवशी हे ऋण व्यक्त करणे चा विधी म्हणून श्रावणी केल्या जाते. यात जुने जाणवे बदलण्याचा विधी असतो. या श्रावणीस उपा कर्म असेही म्हणतात.( या विधी बद्दल मी स्वतंत्र लेख लिहिला आहे).

भारता सोबतच इतर देशातही जिथे जिथे हिंदू आहेत तिथे तिथे हा सण उत्साहात साजरा केला जातो. भाऊ बहिणीच्या निर्मळ प्रेमाची आठवण म्हणून या सणाकडे पाहिल्या जाते.

# निसर्गप्रेमी लेखक – प्रा. विश्वास वसेकर

**ज्योतिर्मय साहित्य**






पत्रकार विनायक लिमये यांच्या संकल्पनेतून, प्रयत्नातून माझे मित्र प्रसिद्ध लेखक प्रा विश्वास वसेकर यांच्या पंचाहत्तीरीचा तसेच त्यांच्या 'सृष्टी' या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ कार्यक्रम नुकताच पुणे येथे २० ऑगस्ट रोजी साकार झाला. या कार्यक्रमात लक्ष्मीकांत देशमुख,भारत सासणे, रविंद्र शोभणे आणि प्रा मिलिंद जोशी यांनी प्रा विश्वास वसेकर यांच्या साहित्य सेवेबद्दल महत्त्वाचे मुद्दे मांडले. डॉ सदानंद मोरे यांनी अध्यक्षीय भाषणात वसेकरांनी जे 'सृष्टी' पुस्तक प्रकाशित केले त्याबद्दल असे म्हंटले'सृष्टी अशा विषयावर आणि अशा आशयाची पुस्तके हल्ली कोणी लिहित नाहीत. चांगला शैलीकार ज्यांने अशा पद्धतीने मोजकेच लिहिले त्यांची आठवण निश्चितपणे इथे करता येते.असे सांगताना ते म्हणाले जी पुस्तके विशेषत: सृष्टीबद्दल, झाडांबद्दल आहेत ज्यामध्ये फुलेही आली आणि पानेही आली त्यांचे आपल्या आयुष्यात विशेष महत्त्व आहे. सदानंद मोरे पुढे म्हणाले, तुम्हाला आश्चर्य वाटेल ज्या एका शहराला आपण ख्रिश्चन धर्मिक राजधानी व्हॅटिकन सिटी म्हणतो त्या ठिकाणी पोपचा महाल, निवासस्थान आहे त्या निवासस्थानाची निम्मी जागा बागेसाठी आहे. ती आत्तापासून नाही तर १३ व्या शतकापासून त्यांनी ती डेव्हलप करत आणली आहे. तिथे जर तुम्हाला जायचे असेल तर परवानगी काढावी लागते. हे भाषण ऐकत असताना मला २०१६ साली मी युरोप ट्रिप मध्ये व्हॅटिकन सिटी बघितली त्याची आठवण झाली.

व्हॅटिकन सिटी हे जगातील सर्वात लहान स्वतंत्र राष्ट्र असून ते इटलीतील रोम शहराच्या मध्यभागी वसलेले आहे. या राष्ट्राचे एकूण क्षेत्रफळ अंदाजे ०.४४ चौरस किलोमीटर इतके आहे, आणि विशेष म्हणजे या संपूर्ण भूभागापैकी जवळपास निम्मा भाग म्हणजे सुमारे २३ हेक्टर क्षेत्र हे हिरव्यागार बागांनी व्यापलेले आहे. या बागांना व्हॅटिकन गार्डन्स किंवा जिआर्दिनी व्हॅटिकानी या नावाने ओळखले जाते. रोमन कॅथलिक चर्चचे सर्वोच्च धर्मगुरू असलेल्या पोपच्या निवासस्थानाला लागून असलेल्या या बागा शतकानुशतके काळजीपूर्वक जोपासल्या गेल्या असून त्या केवळ निसर्ग सौंदर्यासाठीच नव्हे तर धार्मिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक दृष्ट्याही अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जातात.

या बागांच्या निर्मितीचा इतिहास तेराव्या शतकापर्यंत मागे जातो. इसवी सन १२७९ मध्ये पोप निकोलस तिसरे यांनी आपले निवासस्थान लॅटरन पॅलेसमधून व्हॅटिकन टेकडीवर हलवण्याचा निर्णय घेतला. या नव्या निवासस्थानाभोवती त्यांनी संरक्षक भिंत बांधून घेतली आणि त्या आतील मोकळ्या जागेत फळबागा, हिरवळ आणि शोभिवंत झाडे लावण्याचे काम सुरू केले. या उपक्रमामागचा मुख्य उद्देश पोपसाठी शांत, सुरक्षित आणि निसर्गरम्य असे विश्रांतीस्थान निर्माण करणे हा होता.जेथे ते शहराच्या गजबजाटापासून दूर राहून प्रार्थना, चिंतन आणि मनन करू शकतील. या सुरुवातीच्या प्रयत्नांमुळेच पुढील शतकांमध्ये या बागांचा विस्तार होत गेला. पुनर्जागरण काळातील विकास पंधराव्या व सोळाव्या शतकात, म्हणजे पुनर्जागरण (रेनेसाँ) काळात या बागांना खऱ्या अर्थाने भव्य स्वरूप प्राप्त झाले. पोप निकोलस पाचवे, पोप ज्युलियस दुसरे आणि पोप पॉल तिसरे यांसारख्या अनेक पोपनी या बागांच्या सुशोभीकरणासाठी मोठे योगदान दिले. प्रसिद्ध वास्तुविशारद दोनातो ब्रामांते यांनी बेल्वेदेरे प्रांगणाची रचना केली, जी पुढे या बाग परिसराचा एक महत्त्वाचा भाग बनली. याच काळात कारंजी, पुतळे, संगमरवरी शिल्पे आणि भौमितिक आकाराचे हिरवळीचे तुकडे यांची भर पडली. इटालियन पुनर्जागरण शैलीतील बाग रचनेचे हे एक उत्कृष्ट उदाहरण मानले जाते.

व्हॅटिकन गार्डन्समध्ये प्रामुख्याने तीन वेगवेगळ्या शैली एकत्र नांदताना दिसतात. इटालियन शैलीतील बागांमध्ये भौमितिक रचना, छाटलेली झुडपे आणि संगमरवरी कारंजी यांचा समावेश आहे. फ्रेंच शैलीतील बागांमध्ये सुबक आणि सुसंघटित फुलझाडांचे ताटवे दिसतात. इंग्लिश शैलीतील बागांमध्ये नैसर्गिक, कमी आखीव-रेखीव अशी हिरवळ आणि मोठमोठी वृक्षराजी आहे. या तिन्ही शैलींचा सुरेख संगम या बागांना एक वेगळे सौंदर्य प्रदान करतो.

या बागांमध्ये अनेक धार्मिक स्मारके आणि प्रतीके आहेत. यातील एक विशेष आकर्षण म्हणजे फ्रान्समधील लूर्द येथील गुहेची प्रतिकृती, जी १९०२ साली उभारण्यात आली. ही गुहा मदर मेरीच्या दर्शनाच्या स्मरणार्थ बांधली गेली असून पोप आणि व्हॅटिकनमधील कर्मचारी येथे प्रार्थनेसाठी येतात. याशिवाय संत पीटर यांच्या स्मरणार्थ उभारलेले पुतळे, विविध संतांची शिल्पे आणि क्रॉसची प्रतिमा असलेली अनेक ठिकाणे या बागांमध्ये पाहायला मिळतात.

आंतरराष्ट्रीय संबंधांचे प्रतीक व्हॅटिकन गार्डन्सचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विविध देशांचे राष्ट्रप्रमुख आणि मान्यवर पाहुणे यांनी येथे भेट देऊन स्मरणार्थ वृक्षारोपण केलेले आहे. यामुळे या बागा जागतिक शांतता, सद्भावना आणि आंतरराष्ट्रीय संबंधांचे प्रतीक बनल्या आहेत. अनेक राष्ट्रप्रमुखांनी येथे झाडे लावून आपल्या भेटीची आठवण जपली आहे, आणि अशा वृक्षांजवळ त्या-त्या मान्यवरांच्या नावाच्या पाट्याही लावलेल्या आढळतात.

आधुनिक काळातील उपयोग आजच्या घडीला या बागांचा वापर केवळ शोभेसाठी नव्हे तर अनेक व्यावहारिक कारणांसाठीही केला जातो. व्हॅटिकन रेडिओचे प्रक्षेपण करणारे टॉवर्स, हेलिकॉप्टर उतरण्यासाठीचे मैदान (हेलिपॅड), तसेच काही प्रशासकीय व निवासी इमारतीही या बाग परिसरातच आहेत. पोप फ्रान्सिस आणि त्यांच्या आधीचे पोप यांनी या बागांचा वापर दैनंदिन फ `रफटका, चिंतन आणि कधीकधी खासगी भेटींसाठीही केला आहे. पर्यावरणीय समृद्धता जैवविविधतेच्या दृष्टीनेही या बागा महत्त्वाच्या आहेत. येथे शेकडो प्रकारच्या वनस्पती, फ ु लझाडे आणि प्राचीन वृक्ष आढळतात. काही झाडे तर शेकडो वर्षे जुनी असल्याचे सांगितले जाते. या बागांची निगा राखण्यासाठी व्हॅटिकनकडे स्वतंत्र माळी आणि उद्यान व्यवस्थापन विभाग कार्यरत आहे, जो अत्यंत काटेकोरपणे या हिरवाईचे जतन करतो.

एकंदरीत, तेराव्या शतकात पोप निकोलस तिसरे यांनी घातलेल्या पायावर पुढील सातशेहून अधिक वर्षांत विविध पोपनी आणि कलाकारांनी मेहनत घेऊन या बागा घडवल्या आहेत. आज व्हॅटिकन सिटीच्या एकूण क्षेत्रफळापैकी जवळपास निम्मा भाग व्यापणाऱ्या या बागा धार्मिक श्रद्धा, कलात्मक सौंदर्य आणि ऐतिहासिक वारसा यांचा अनोखा संगम दर्शवतात. जगातील सर्वात लहान राष्ट्रामध्ये इतक्या मोठ्या प्रमाणावर हिरवाई जपली जाणे, हे स्वतःच एक उल्लेखनीय आणि प्रेरणादायी उदाहरण आहे.

प्रा विश्वास वसेकर यांचे निसर्गविषयक लेखनाचे 'सृष्टी'हे पाचवे पुस्तक आहे. त्यांचे या आधीचे ऋतू बरवा हे पुस्तक सर्वार्थाने भाग्यवान ठरले. मराठीमध्ये निसर्गलेखनाची एक समृद्ध परंपरा आहे. पुस्तकी ज्ञानापेक्षा स्वतःच्या निरीक्षणातून नोंदी करायच्या हे सर्व निसर्गप्रेमींनी प्रा विश्वास वसेकर यांच्या निसर्ग लेखनातून ठरविणे हे महत्त्वाचे आणि आनंददायी.

***

# संस्कृत दिन: ज्ञान, संस्कृती आणि विश्वबंधुत्वाची भाषा

**ज्योतिर्मय साहित्य**




श्रावणी पौर्णिमा २८ ऑगस्ट संस्कृत दिन

श्रावणी पौर्णिमा हा दिवस भारताच्या सांस्कृतिक जीवनातील एका अत्यंत महत्त्वाच्या भाषेला अभिवादन करण्याचा दिवस आहे, संस्कृत दिन. संस्कृत ही केवळ एक प्राचीन भाषा नाही; ती भारताच्या हजारो वर्षांच्या ज्ञानपरंपरेचे, तत्त्वचिंतनाचे, साहित्याचे, विज्ञानाचे आणि अध्यात्माचे प्रभावी माध्यम आहे. भारतीय संस्कृतीचा इतिहास आणि संस्कृतचा इतिहास यांचे नाते इतके घट्ट आहे की, एकाचा विचार दुसऱ्याशिवाय करणे जवळजवळ अशक्य आहे.

'संस्कृत' या शब्दाचा अर्थ संस्कारित, परिष्कृत आणि व्यवस्थित केलेली भाषा असा होतो. तिची व्याकरणव्यवस्था अत्यंत शास्त्रीय आहे. पाणिनीच्या अष्टाध्यायीने संस्कृत व्याकरणाला जी नियमबद्ध चौकट दिली, ती आजही भाषाविज्ञानाच्या अभ्यासकांसाठी विलक्षण महत्त्वाची मानली जाते. शब्दांच्या निर्मितीपासून त्यांच्या रूपांतरापर्यंतची सूक्ष्म व्यवस्था, अर्थातील बारकावे व्यक्त करण्याची क्षमता आणि असंख्य नवीन शब्द निर्माण करण्याची सामर्थ्यशाली पद्धती ही संस्कृतची वैशिष्ट्ये आहेत. भाषेच्या रचनेत स्पष्टता, नेमकेपणा आणि लवचिकता यांचा सुंदर समन्वय आढळतो. संस्कृत भाषेत १०, २७, ८५, ००,०००,००० दहा निखर्व सत्तावीस खर्व पंच्यांशी अब्ज इतके कमीत कमी शब्द निर्माण करता येतात व हे सर्व शब्द नाहीत.

संस्कृतचे महत्त्व तिच्या व्याकरणापुरते मर्यादित नाही. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, भगवद्गीता, पुराणे, कालिदासाचे काव्य, कौटिल्याचे अर्थशास्त्र, भरतमुनींचे नाट्यशास्त्र, चरकसंहिता, सुश्रुतसंहिता, आर्यभटीय आणि असंख्य ग्रंथ या भाषेत निर्माण झाले. धर्म आणि अध्यात्माबरोबरच गणित, खगोलशास्त्र, आयुर्वेद, राज्यशास्त्र, नीतिशास्त्र, व्याकरण, तर्कशास्त्र, नाट्य आणि काव्यशास्त्र अशा विविध ज्ञानक्षेत्रांना संस्कृतने समृद्ध केले. त्यामुळे संस्कृतला केवळ धार्मिक भाषा म्हणणे तिच्या व्यापक योगदानावर अन्याय करणारे ठरेल.

संस्कृत वाङ्मयातील विचारांची व्याप्तीही विलक्षण आहे. ऋग्वेदातील प्रार्थना म्हणते, ''आ नो भद्राः क्रतवो यन्तु विश्वतः।'' अर्थात, सर्व दिशांकडून कल्याणकारी विचार आमच्याकडे येऊ देत. या एका वाक्यातच भारतीय चिंतनाची उदारता आणि विश्वाकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी व्यक्त होते.

संस्कृत साहित्यामध्ये निसर्गाविषयीची संवेदनशीलता, मानवाच्या मनाचा सूक्ष्म अभ्यास, कर्तव्य आणि नैतिकता, सत्याचा शोध आणि विश्वकल्याणाची भावना यांचे सुंदर दर्शन घडते. ''वसुधैव कुटुम्बकम्'' हा विचार आजच्या जागतिकीकरणाच्या युगात विशेष अर्थपूर्ण वाटतो. संपूर्ण पृथ्वीला एक कुटुंब मानण्याची ही दृष्टी आधुनिक मानवतेसमोरील अनेक संघर्षांवर चिंतन करण्यास प्रेरणा देऊ शकते. ''सर्वे भवन्तु सुखिनः।'' ही मंगलकामना देखील मानवी कल्याणाचीच व्यापक कल्पना व्यक्त करते.

आजच्या डिजिटल आणि तंत्रज्ञानप्रधान युगात संस्कृतकडे नव्या दृष्टीने पाहण्याची आवश्यकता आहे. संगणकीय भाषाविज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल ग्रंथालये आणि भारतीय ज्ञानपरंपरेवरील संशोधन यांमुळे संस्कृत ग्रंथांना जगभर नव्या वाचकांपर्यंत पोहोचण्याची संधी निर्माण झाली आहे. अनेक देशांतील विद्यापीठांमध्ये संस्कृतचा अभ्यास केला जातो. आधुनिक तंत्रज्ञान संस्कृतच्या पुनरुज्जीवनासाठी अडथळा नसून एक प्रभावी साधन ठरू शकते. जुन्या हस्तलिखितांचे डिजिटल रूपांतर, संस्कृत ग्रंथांचे संगणकीय विश्लेषण आणि ऑनलाइन शिक्षण यामुळे या भाषेच्या अभ्यासाला नवी दिशा मिळत आहे.

संस्कृतचे खरे पुनरुज्जीवन केवळ तिचे प्राचीन वैभव सांगण्यात नाही. संस्कृत भाषा बोलली गेली पाहिजे, ऐकली गेली पाहिजे, वाचली आणि लिहिल्या गेली पाहिजे. संस्कृत मधून संवाद व्हायला हवा. संस्कृत भारती ही सामाजिक संस्था भर्ता व जगातील २६ देशामध्ये संस्कृतच्या प्रचाराचे व प्रसाराचे कार्य करितआहे. त्यापैकी, १० दिवस दररोज केवळ दोन तास इतक्या कालावधीत दररोजच्या कामाचे स्स्मक्रृत संभाषण शिकता येते, व ते ही नि:शुल्क !

नव्या पिढीला संस्कृत शिकवताना तिच्याकडे केवळ परीक्षेचा विषय म्हणून न पाहता ज्ञान, संवाद आणि सर्जनशीलतेचे माध्यम म्हणून पाहिले पाहिजे. संस्कृतमध्ये नवे साहित्य निर्माण झाले, आधुनिक विषयांवर लेखन झाले आणि दैनंदिन व्यवहारात तिचा सहज वापर वाढला, तर ती अधिक सशक्तपणे वर्तमानाशी जोडली जाईल. जी भ्षा बोलल्या जाते तीच भाषा जिवंत राहते, म्हणून आपण सर्वांनी आपले राष्ट्रीय कर्तव्य म्हणून संस्कृतमध्ये संभाषण करायला हवे.

संस्कृत दिनाच्या निमित्ताने आपण केवळ संस्कृतचा गौरव करण्यापुरते न थांबता तिच्याशी प्रत्यक्ष नाते जोडण्याचा संकल्प करूया. तिच्या प्राचीन ज्ञानाचा चिकित्सक अभ्यास करूया आणि त्यातील उपयुक्त विचार आधुनिक संदर्भात समजून घेऊया. परंपरेचा अभिमान आणि आधुनिकतेची दृष्टी यांचा समन्वय साधणे हीच संस्कृतला वर्तमानकाळात जिवंत ठेवण्याची योग्य दिशा ठरेल.

उपनिषदांचा उदात्त संदेश आहे, ''तमसो मा ज्योतिर्गमय।'' अंधकारातून प्रकाशाकडे घेऊन चला. हा प्रकाश केवळ अध्यात्माचा नाही; तो ज्ञानाचा, विवेकाचा आणि मानवतेचा प्रकाश आहे, म्हणूनच संस्कृत दिन हा केवळ एका भाषेचा उत्सव नाही; तो भारताच्या ज्ञानपरंपरेचा, संस्कृतीचा, चिंतनाचा आणि विश्वकल्याणाच्या उदात्त दृष्टिकोनाचा उत्सव आहे. संस्कृतचा सन्मान म्हणजे केवळ तिच्या भूतकाळाचा गौरव नव्हे, तर तिच्या ज्ञानातून वर्तमानाला समृद्ध करण्याचा आणि भविष्यासाठी नवे विचार घडवण्याचा प्रयत्न होय.